शनिवार । २० सप्टेंबर १९८० । एक रुपया

माणूस

# मोरादाबाद आणि मल्लापुरम्

जातीय दंगलींना तोंड देण्यासाठी भारत सरकार आता एका खास निधर्मी संयुक्त शांतता दलाची स्थापना करणार आहे. या दलाच्या तीन बटालियन्स उभारण्यास सरकारने संमती दिली आहे व मुख्यत्वेकरून या दलात अल्पसंख्यांक जमातीचे, तसेच वर्गीकृत जाती व जमातींचे लोक घेण्यात येतील असेही यासंबंधीच्या वार्तेत म्हटलेले आहे. (पहा–महाराष्ट्र टाइम्स, शनिवार १३ सप्टेंबर अंक, पृष्ठ १)

□

जुलै ३०. केरळातील मुस्लिम बहुसंख्या असलेला मल्लापुरम जिल्हा. इंडियन युनियन मुस्लिम लीगच्या युवक शाखेने केरळभर जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेऱ्यांसमोर योजलेल्या निरोधनांच्या (Picketing) कार्यक्रमानुसार येथेही कार्यक्रम सुरू आहे. सुमारे सहा हजारांचा मुस्लिम जमाव. कार्यक्रम निरोधनाचा असला तरी जमावापैकी काहींजवळ शस्त्रे होती. निरोधनाचे निदर्शनात रूपांतर झाले व शेवटी पोलीस व जमाव यांच्यात चकमक उडाली. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात तीन निदर्शक ठार झाले. एक पोलीसही मरण पावला. " According to the Kerala Home Minister, the demonstrators carried weapons, made an unprovoked attack on the police and killed one policeman on the spot...." असे मुकुंदन सी. मेनन यांनी इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली या मुंबईहून निघणाऱ्या डाव्या साप्ताहिकातल्या ३० ऑगस्टच्या अंकात यासंबंधी जे वार्तापत्र लिहिले आहे त्यात म्हटले आहे. या चकमकीत किमान ४० जण जखमी झाले. त्यात १५ पोलीस आहेत. जमावाकडून ३ बसेस व १ जीप जाळण्यात आली. पोलीस चौकी, व्हिजिलन्स ऑफिस व पोलीस लाइन यावर हल्ला झाला. तेथील चीजवस्तू लुटली गेली. कागदपत्रे व इतर सरकारी सामानाची होळी करण्यात आली.

या प्रसंगी हजर असलेल्या केरळातील दोन मुस्लिम लीग आमदारांनी या चकमकीची सर्व जबाबदारी पोलिसांवर टाकलेली आहे.

सरकारतर्फे या घटनेची न्यायालयीन चौकशी होणार आहे.

असा प्रकार केरळात पूर्वी कधीही झाला नाही असे केरळच्या गृहमंत्र्यांनी म्हटलेले आहे, तर केरळचे मुख्यमंत्री नयनार यांनी 'दैनिक चंद्रिका' या इंडियन युनियन मुस्लिम लीगच्या स्थानिक वृत्तपत्राच्या त्याच दिवशीच्या, म्हणजे ३० जुलैच्या संपादकीयावर विशेष आक्षेप घेतला आहे. हे संपादकीय म्हणते–' बद्र योद्धयांची स्मृती जागवणारा आजचा पवित्र दिवस आहे. आज मुस्लिम तरुणांची मने एका नव्या शक्तीने व स्फूर्तीने भारलेली असणे स्वाभाविक आहे. केरळ सरकारचे उर्दू-अरेबिक भाषेवर अन्याय करणारे धोरण हाणून पाडण्यासाठी हे तरुण आज पुढे सरसावत आहेत. लवकरच नयनार सरकाच्या मृत्युघंटेचे आवाज सर्वत्र निनादू लागतील........'

गेली दहा वर्षे उर्दू-अरेबिक भाषेसंबंधी जे धोरण केरळात मुस्लिम लीगच्या संमतीनेच अवलंबिले गेलेले आहे त्यात नयनार सरकारने काहीही बदल केलेला नाही, असे सरकारपक्षाचे म्हणणे आहे. फक्त उर्दू-अरेबिक शिक्षकांच्या पात्रतेसंबंधीचे काही नियम व अटी अंमलात आणण्याचा निर्णय मात्र घेण्यात आला होता. यामुळे बरेच जुने उर्दू-अरेबिक शिक्षक अपात्र ठरून, काही शाळा-वर्ग वगैरे बंद पडण्याचा धोका जाणवल्यामुळे मुस्लिमांचा याला विरोध होता. हा विरोध वाढल्यामुळे व ३० जुलैला वर दिलेल्या मल्लापुरम चकमकीमुळे केरळच्या नयनार सरकारने सध्या तरी माघार घेऊन, पूर्वीचेच धोरण चालू ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे.

नयनार सरकार हे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे बहुमत

असलेले सयुक्त सरकार आहे.

¤

मोरादाबाद, अलिगढ किंवा उत्तर प्रदेश–मध्यप्रदेशमध्ये नुकत्याच घडलेल्या मुस्लिम–पोलीस दंगलीवर मतप्रदर्शन करताना डाव्या विचारसरणीच्या वृत्तपत्रानी व स्तभलेखकांनी पोलिसांवर टीका केलेली आहे. अडीच वर्षांच्या जनता राजवटीत संघ–जनसघाची बरीच माणसे पोलीसदलात घुसल्यामुळे किंवा घुसवण्यात आल्यामुळे संपूर्ण उत्तर भारतातील पोलीसदलांवरचाच मुस्लिमाचा विश्वास आता उडालेला आहे, असेही बरेच काही सागितले गेले–लिहिले गेले. केरळात तर संघाची किंवा जनता पक्षाची राजवट कधीच नव्हती. त्यामुळे तेथील पोलीसदल पूर्ण निधर्मी असण्यास काहीच हरकत नाही. शिवाय डाव्या कम्युनिस्टाचे व मुस्लिम लीगचे केरळातील परस्पर नातेसंबंध विख्यात आहेत. मोपल्याच्या बंडाला स्वातत्र्याचा उठाव समजून, त्यात भाग घेतलेल्याना मानपत्रे वगैरे देण्यातही नंबुद्रिपादांना कधीच संकोच वाटलेला नव्हता! केरळातली मुस्लिम लीग वेगळी आहे, असे प्रशस्तीपत्र इंदिरा गांधीनीही दिलेले आहेच. असे सगळे केरळातील वातावरण निधार्मिक व पुरोगामी असतानाही येथल्या पोलीसदलावर मुस्लिमांनी हल्ला का करावा?

मोरादाबादमध्ये डुकरामुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्या, त्यामुळे मुस्लिम जमावाने पोलिसांवर हल्ला चढवला.

मल्लापुरम्‌मध्ये तर डुक्कर कुठे भावना दुखवायला आलेले नव्हते! ज्याच्या गळ्यात गळा घालून मुस्लिमांनी केरळात सत्तेचा खेळ केला त्या मार्क्सवादी नयनार सरकारचे पोलीसदल तर मुस्लिमविरोधी असण्याची शक्यता नव्हती! बरं, प्रश्नही तसा मामुली. जुनाट धर्मशिक्षण देणाऱ्या काही शाळा किंवा वर्ग फार तर बंद पडले असते, जुन्या पद्धतीने शिकवणाऱ्या काही ऊर्दू-अरेबिक शिक्षकांवर काही काळ घरी बसण्याची पाळी आली असती. थंड डोक्याने विचार करून यावर तोडगा शोधून काढणे अशक्य नव्हते; पण त्यासाठी एकदम पोलिसांवर हल्ला काय, सरकारी सामानाची लुटालूट, जाळपोळ काय, ३–४ जणांचा मृत्यू काय, नयनार सरकारची मृत्यूघटा वाजवणे काय–सगळाच माथेफिरूपणा! मोरादाबाद असो, मल्लापुरम् असो; राजवट जनताची असो, कम्युनिस्टाची असो, काँग्रेसवाल्याची असो. माथेफिरूपणात बदल नाही!

¤

भारत सरकारचे संकल्पित निधर्मी शांतता दल म्हणजे या माथेफिरूपणाला दिलेली एक मान्यताच आहे. आपल्या देशभरच्या सर्व पोलीसदलावर, राखीव दलावर, सैन्यदलांवर आपलाच विश्वास नाही, याची ही एक लाजिरवाणी कबुलीच आहे. दंगलीचा बंदोबस्त करताना ह्या दलांपैकी जे कुणी पक्षपात किंवा धार्मिक भेदाभेद करताना आढळतील त्याच्यावर कठोर कारवाई झाली, त्यांना धाक वाटेल अशा शिक्षा दिल्या गेल्या तर कुणीही हे आक्षेपार्ह मानणार नाही. अशी कडक उपाययोजना व्हायलाही हवी. सेक्युलॅरिझमचा आपल्या संदर्भात हा आणि एवढाच अर्थ आहे. वेगळेपणाची भावना जोपासणे म्हणजे सेक्युलॅरिअम नव्हे. हा ब्रिटिश वारसा आहे व तो काँग्रेस सरकारने जसाच्या तसा उचलला आहे. ब्रिटिशांनी लावलेली, काँग्रेसने वाढवलेली ही अलगपणाची विषवल्ली आता इतर पक्षातही फोफावू पाहत आहे. सात-आठ कोटी मुस्लिमाचा, पाच–सहा कोटी इतर अल्पसंख्याकांचा प्रश्न या पद्धतीने सोडवायचा म्हटले तर हिंदुस्थानच काय आशियाखंडही अपुरा पडेल! आज या सर्वांच्या हितरक्षेणासाठी स्वतंत्र पोलीस दल मागितले गेले, दिलेही गेले. उद्या स्वतंत्र सैन्यदलाची मागणी होईल, परवा स्वतंत्र राजधानी आणि पंतप्रधानही का नको?

¤

जोवर 'इंडिया दॅट इज भारत' ही काँग्रेसी दृष्टी आहे तोवर ही अलगपणाची भावना वाढतच जाणार आहे.

निदान 'भारत दॅट इज इंडिया' एवढे तरी म्हणायला लागा!

श्री. ग. मा.


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : सोळावा

२० सप्टेंबर १९८०

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

### मराठवाडा साहित्य परिषद

# निवडणुकांमुळे मरगळ जाईल का ?

मराठवाडा साहित्यपरिषदेच्या कार्यकारिणीची दर तीन वर्षांनी होणारी निवडणूक यंदा होत आहे. यंदाच्या निवडणुकीचं वैशिष्ट्य म्हणजे या वेळी कधी नव्हे ती गटबाजी निर्माण झाली आहे (एकंदरीत मराठवाड्याची साहित्यपरिषद याही बाबतीत पुणेकराच्या मागं राहण्यास तयार नाही. की मराठवाडा साहित्यपरिषद वयात आली असा याचा अर्थ घ्यायचा ?)

बेचाळीस उमेदवार या वेळी उभे आहेत आणि त्यात प्राचार्य नरहर कुरुंदकर, प्राचार्य गजमल माळी, प्रा. गंगाधर पानतावणे, प्रा. तु. शं. कुलकर्णी, (सध्याचे 'काळजीवाहू' कार्यवाह काळजीवाहू म्हणायचं कारण असं की ते काही महिन्यांपूर्वीच कार्यवाह झाले आहेत) आमदार–कवी ना धो. महानोर, डॉ. प्रभाकर माडे, जनार्दन वाघमारे इत्यादी मातब्बर मंडळींचा यात समावेश आहे मागील निवडणुकीच्या १५ जागासाठी फक्त १५ जणच उभे होते. यंदा मात्र सख्या दुपटीहून वाढली आहे. मतदारांची संख्यादेखील सुमारे २५०० झाली आहे. याचा अर्थ सर्वसामान्य माणसाला परिषदेबद्दल फार जिव्हाळा निर्माण झाला आहे असा नाही. आपल्या गटाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून यावेत यासाठी मंडळींनी दणदणीत मोहिमा काढून सदस्य नोंदवले आहेत. अस्मादिकांना सुद्धा या मोहिमेचा फटका बसला आहे पण तो कोणत्या गटाकडून ते मात्र याठिकाणी सांगत नाही. (कारण असे गट आहेत, गटबाजी आहे, हे कुणीच मान्य करत नाही !)

गेल्या वेळी लोकांच्या अगदी हातापाया पडून त्यांना निवडणुकीसाठी उमेदवारी स्वीकारायला लावण्यात आली. यावेळी तशी परिस्थिती नाही. 'आपण काही प्रचार वगैरे करणार नाही बुवा " असं म्हणत म्हणत पत्रं वगैरे पाठवून प्रचार चालूच आहे निवडून यायचा हा उत्साह पुढं काम करतानाही असाच कायम टिकून राहो, असं म्हणावंसं वाटतं. त्याचं कारण असं की सध्या तरी मराठवाडा साहित्य परिषद ही एखाद्या मोठ्या घरात एखाद दूरच्या नात्यातलं अनाथ मूल वाढावं तशी जगते आहे.

अगदी वरवरच्या गोष्टींचा विचार केला तरी परिषदेची सध्याची स्थिती किती केविलवाणी आहे ते कळतं. याठिकाणी पुणे किंवा नागपूर इथल्या परिषदांच्या कामाशी तुलना केली नाही तरीही मराठवाडा साहित्य परिषदेची प्रकृती काही चांगली नाही हे जाणवतं. मराठवाडा साहित्य परिषदेची इमारत अगदी लहान, एखादं प्रशस्त सभागृह देखील परिषदेकडे नाही. (अर्थात् त्यामुळे अगदी साधी दुखवटयाची सभादेखील हाऊसफुल होते हे एक समाधान आहे म्हणा !) गेल्या महिन्यात नादापूरकर स्मृती व्याख्यान माला झाली होती तेव्हा काही लोकांना बाहेर व्हरांड्यात थांबावं लागलं होतं. परिषदेच्या आवारात सध्या जरा काही झाडं वगैरे तरी आहेत.तीन वर्षांपूर्वी तिथं निव्वळ खडकाळ जमीन होती म्हणे !

ग्रंथालयाची चळवळ हे साहित्यपरिषदेसारख्या संस्थेचं महत्त्वाचं अंग असायला हवं. 'संडासाजवळच्या एका अंधाऱ्या खोलीत कशी तरी कोंबलेली पुस्तकं', असं इथल्या परिषदेच्या ग्रंथालयाचं स्वरूप आहे.

लोकांना परिषदेच्या अस्तित्वाची जाणीव निर्माण करून देणारे काही कार्यक्रम ठराविक काळानंतर हाती घेत राहावेत, अशी एक अपेक्षा असते. नादापूरकर व्याख्यानमाला वगळता गेल्या वर्षात अशा स्वरूपाचा एकही कार्यक्रम झाला नाही. सर्वसामान्य माणसाला आकर्षित करून घेतील अशी व्याख्यानं ठेवली नाहीत तरी निदान अभ्यासमंडळं, शिबिरं असे गंभीरप्रकृतीचे कार्यक्रम तरी परिषदेनं घ्यावेत असं वाटणं रास्त आहे पण जिथं परिषदेच्या कार्यकारिणीच्या बैठकाच आवश्यक तितक्या प्रमाणात होत नाहीत तिथं व्याख्यानमाला, चर्चासत्रं, अशा कार्यक्रमाची अपेक्षाच कशी ठेवणार ?

आणखी एक काहीसं धक्कादायक प्रकरण म्हणजे परिषदेच्या काही वस्तूच *गायब* झाल्या आहेत. घड्याळ, पंखा, खुर्च्या या वस्तू चक्क अदृश्यच झाल्या आहेत !

'प्रतिष्ठान' नावाचं एक द्वैमासिक परिषदेतर्फे काढण्यात येतं. खरं म्हणजे गंगाधर पानतावण्यांसारखा माणूस आपल्या एकट्याच्या हिंमतीवर 'अस्मितादर्श' हे त्रैमासिक सतत बारा वर्षं चालवू शकतो तर परिषदेला 'प्रतिष्ठान' हे मासिक करणं अशक्य होऊ नये. तिकडे खानदेशात प्रा. पुरुषोत्तम पाटील, प्राचार्य म. सु. पाटील, वा. रा. सोनार, भा. ज. कविमंडन, रमेश वरखेडे इत्यादी मंडळी मोठ्या धडाडीनं 'अनुष्टुभ्' सारखं नामी द्वैमासिक चालवत आहेत ; पण परिषदेसारख्या एका विभागीय संस्थेला मात्र 'प्रतिष्ठान' हे मासिक म्हणून काढता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. प्रा. नागनाथ कोत्तापल्ले यांनी तीन वर्षांपूर्वी प्रतिष्ठानचं संपादकत्व स्वीकारलं आणि बरीच खटपट करून निदान द्वैमासिक म्हणून तरी त्याचं गाडं रुळावर आणलं. आता प्रतिष्ठानला मिळणाऱ्या अनुदानात वाढ झाली आहे, कागदाचा बऱ्यापैकी कोटा येऊन पडला आहे; पण मराठवाड्यातले अनेक उगवते साहित्यिक प्रथम 'अस्मितादर्श'ने पुढं आणले, हे नाकारता येणार नाही. मराठवाडा साहित्य परिषदेचा त्यात असावा तितका वाटा नाही.

पुण्यातल्या किंवा नागपूरमधल्या साहित्य परिषदांना नियमित उत्पन्नाची स्वत:ची अशी साधनं आहेत. मराठवाडा साहित्य परिषदेकडे सध्या तरी तसं कोणतही साधन नाही. एक नाट्यगृह बांधायची योजना मांडण्यात आली, तिला सरकारनं २५ हजाराचं अनुदानही दिलं; पण त्यात पुढं काही तरी 'तात्रिक' अडचणी निर्माण झाल्या आणि पुढं काहीच हालचाल होईना ! शेवटी 'अनुदान' परत करा !' असा सरकारनं तगादा लावला तेव्हा जरा हालचाल झाली!

'परिषदेकडे पैसा नाही' ही एक अडचण सांगितली जाते; पण खरी अडचण ती नाही. अडचण अशी आहे की, मराठवाडा साहित्य परिषद ही आपली संस्था आहे या भावनेन अंग मोडून काम करणारी माणसंच नाहीत. पानतावण्यांनी म्हटल्याप्रमाणे 'प्रचंड

उदासीनता' आहे. ही उदासीनता किती असावी? या मावळत्या कार्यकारिणीत काही सभासद असे होते की, त्यांनी निवडून आल्यावर दुसऱ्या वर्षीची प्राथमिक सदस्यत्वाची वर्गणीही भरली नव्हती! सस्थेबद्दल आत्मीयता नाही, प्रेम नाही. याबाबत एक मजेदार किस्सा कानावर आला. परिषदेनं औरंगाबादेत येणाऱ्या साहित्यिकांसाठी उतरण्याची सोय व्हावी म्हणून एका खोलीत दोन कॉटस् ठेवल्या. एकदा त्या खोलीत एक परगावचे साहित्यिक आणि परगावचेच मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकरिणीचे एक सदस्य, असे दोघं उतरले होते. हे कार्यकारिणीचे सदस्य एकदा रात्री परत आले तर खोलीला कुलुप होतं आणि त्याची किल्ली तिथल्या नोकराकडे ठेवायला ते परगावचे साहित्यिक विसरले होते. या कार्यकारिणीच्या सदस्यानं रागावून चक्क खोलीचं ते दार तोडलं! आता कार्यकरिणीचा सदस्यच जर परिषदेवर इतकं अफाट प्रेम करतो, तिथं इतरांकडून काय अपेक्षा करायची?

महाराष्ट्र सरकारकडून नव्या लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी अनुदान द्यायची योजना आहे. परिषदेनं मराठवाड्यातील ८-१० तरुण लेखकांची पुस्तकं या योजनेखाली प्रकाशित करायला काय हरकत आहे? गेल्या काही वर्षांत परिषदेनं लक्ष्मीकांत प्रामाणिक, भ. मा परसवाळे आणि गणेश घाणगे अशा काही मोजक्या नवोदित साहित्यिकांची पुस्तकं स्वत: प्रकाशित केली आहेत पण शासनाच्या अनुदानयोजनेचा फायदा मात्र अजिबात उठवलेला नाही.

औरंगाबादेत आणि मराठवाड्यात इतके नामवंत साहित्यिक असताना परिषदेला अशी मरगळ का यावी? एखाद्या अशक्त, रोगिष्ट आणि एकलकोंड्या मुलासारखी परिषद सगळ्या साहित्यिक चळवळीपासून, प्रवाह-उपप्रवाहांपासून वेगळी राहिली आहे. नामवंत साहित्यिक इथे येत नाहीत, त्यामुळे सामान्य रसिकही येत नाही. वामनराव चोरघडे साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष असताना औरंगाबादमध्ये आले होते; पण परिषदेला त्यांची दखल घ्यावीशी वाटली नाही. परभणी जिल्ह्यात जितूर तालुक्यात कौसडी नावाच्या गावी. माणसं मराठवाडा पातळीवरचा साहित्यिकाचा मेळावा आयोजित करू शकतात (हा मेळावा लवकरच होत आहे) पण मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे मात्र गेल्या ७-८ वर्षांत असा एकही मेळावा होत नाही— याला काय म्हणायचं? सध्या परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कुरंदकर आहेत, ते नांदेडला असतात. वार्तापत्र लिहिण्यापूर्वी त्यांची भेट घेता आली नाही. त्यामुळे त्यांच्या कोणत्या अडचणी होत्या ते माहीत नाही. पण परिषदेला प्रचंड सुस्ती आली आहे हे मात्र खरं. आणि प्रा. नरहर कुरंदकर, प्रा. गंगाधर पानतावणे, प्रा. गजमल माळी अशी नामांकित माणसं परिषदेशी गेली काही वर्षे तरी निगडित आहेत हेही खरं. परिषदेला धडाडीचं आणि उत्साही नेतृत्व देण्यात हे सर्व जण कमी पडले असं म्हणायचं की तसा झडझडून प्रयत्नच झाला नाही असं म्हणायचं?

कार्यकारिणीच्या यंदाच्या निवडणुकीतल्या गटबाजीचा उल्लेख सुरुवातीलाच केला. या गटबाजीला जातीच्या राजकारणाचा रंग देण्याचा प्रयत्नही होत आहे असं म्हणतात. या गटबाजीबद्दल, निवडणुकीच्या उत्साहाबद्दल मिटक्या मारायच्या की उसासे टाकायचे हा प्रत्येकाच्या वृत्तीचा प्रश्न आहे; पण परिषदेला प्रचंड मरगळ आली आहे आणि ही अतिशय खेदाची गोष्ट आहे याबाबतीत वाद होऊ नये.

(हे वार्तापत्र लिहिण्यापूर्वी अनेकजणाना भेटलो पण मंडळी अतिशय सावधपणे बोलत होती. काय छापावं, काय छापू नये याही बाबतीत अनेकानी सल्ला दिला. त्यामुळं कुणाचंच नाव न घेता लिहावं अशी युक्ती केली!)

—भालचंद्र जोशी

महाराष्ट्रातही नागालँडसारखी फुटीरतावादी चळवळ ठाणे जिल्ह्यात कष्टकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली मूळ धरीत आहे, असा आरोप मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या एक नेत्या श्रीमती गोदावरीताई परुळेकर यानी नुकताच एका पत्रकार परिषदेत केला. 'भूमिसेना' ही ठाणे जिल्ह्यातील डहाणू-तळासरी भागात, कष्टकरी संघटना व मार्क्सवादी पक्ष यांच्याबरोबरच कार्य करणारी आणखी एक संघटना. या भूमिसेनेत काही काळ कार्य केलेल्या एका कार्यकर्त्याने या बाबत मांडलेली ही वस्तुस्थिती—

# महाराष्ट्रात नागालँड तयार होत आहे काय?

**रमण देशपांडे**

गेल्या पंधरवड्यात ठाणे जिल्ह्यात सायवन या गावी कष्टकरी सघटना व सी. पी. एम. कार्यकर्त्यांची चकमक झाली. कष्टकरी संघटनेने सी. पी एम. वर मारझोडीचा आरोप केला. आठवडाभरात गोदुताई परुळेकरांनी भर पत्रकार परिषदेत कष्टकरी संघटनेवर 'परकीय हस्तक' असल्याचा आरोप करून, फुटीरतेचे 'नागालँड टाईप' आंदोलन ही सघटना सुरू करत असल्याचे सांगितले. सर्वसामान्य जनतेचे जिवंत प्रश्न घेऊन, ज्वलत लढे लढणाऱ्या प्रवृत्तीत हे जे दोषारोप सुरू झालेत व त्याचे टोक गाठले जात आहे, त्याची सत्यासत्यता पडताळून पाहाण्याआधी या दोन्ही चळवळीचा इतिहास व ठाणे जिल्ह्यातील परिस्थिती तपासून बघणे महत्त्वाचे ठरेल.

४८-५० साली गोदूताईंनी जो अभूतपूर्व लढा दिला तेथेच खरी आदिवासी चळवळ सुरू झाली लग्नगड्यांची परंपरा, स्त्रियांवर सरसकट बलात्कार, अत्यंत अपुरे वेतन व बेकायदेशीर जमीन बळकावणे या अत्याचारांविरुद्ध सुरू झालेली लाल बावट्याची चळवळ हां हां म्हणता फोफावली व सपूर्ण ठाणे जिल्हा पेटला! माणुसकीचा लढा हेच खरे वर्णन या काळातील लढ्याचे करता येईल. आपणही माणूस आहोत, सघटित शक्तीच्या जोरावर जुलूम-जबरदस्ती धुडकावू शकतो हा विश्वास सर्वप्रथम लाल बावट्याने या भागात निर्माण केला आणि हे स्मरण आणि परंपरा कोणताही आदिवासी कधीच

पृष्ठ २१ वर

# चीन

## नव्या बदलांचे स्वरूप

वा. दा. रानडे

चीनमध्ये नॅशनल पीपल्स कॉंग्रेसच्या बैठकीत सरकार आणि कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वात जे बदल जाहीर करण्यात आले त्याचा विचार माओनंतरच्या चीनने आपल्या भावी विकासाची एक निश्चित दिशा ठरविली आहे, त्या दृष्टिकोनातून करायला हवा. पंतप्रधान हुआ युओफेंग याच्या जागी झाओ झियांग आले. हुआकडे पक्षाचे अध्यक्षपद अजून आहे पण तेही ते कम्युनिस्ट पक्षाच्या कॉंग्रेसचे वेळी सोडतील असा अंदाज आहे. माओनी हुआना आपले वारस नेमले होते; पण त्याचे महत्त्व आता कमी झाले असून डुंग झियाओ पिंग हे चीनमधील नव्या बदलामागचे खरे सूत्रधार आहेत. सरकारमधील व पक्षातील महत्त्वाच्या पदावर त्यानी आपली माणसे आणली आहेत. पंतप्रधानपदी त्यांनी झाओना आणले. त्याचप्रमाणे पक्षाच्या सरचिटणीसपदी हुसियाओ बॅंग याची नेमणूक केली आहे.

नुसते नेतृत्वच बदलले नाही तर धोरणातही बदल झालेला आहे. चीनला माओच्या मार्गापेक्षा निराळया मार्गाने नेणारे नेतृत्व चीनमध्ये आता स्थिर झाले आहे.

हा निराळा मार्ग कोणता? चीनमध्ये नेमके काय बदलले आहे? आणि काय बदललेले नाही? स्टालिननंतरचा रशिया आणि माओनंतरचा चीन याची काही तुलना करता येईल का? सरकारमध्ये तसेच पक्षात एकाच व्यक्तीच्या हाती, दीर्घकाळ सत्ता राहिली तर तिच्या हातून चुका होऊ लागतात. हे स्टालिनच्या बाबतीत घडले तसेच माओच्याही बाबतीत घडले. सांस्कृतिक क्रांतीच्या प्रयोगाने चीनची मोठी हानी झाली, अर्थव्यवस्थेची, शिक्षणाची घडी विस्कळित झाली. ही पुनः व्यवस्थित बसवून आधुनिकीकरणाचा कार्यक्रम धडाक्याने हाती घेण्यावर नव्या नेत्यानी लक्ष केंद्रित केले आहे.

त्याच्या नव्या मार्गाचा व धोरणाचा विचार करण्यापूर्वी माओच्या सांस्कृतिक क्रांतीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करायला हवे. क्रांतीची धार बोथट होत आहे आणि आपले सहकारी सुधारणावादाच्या आहारी जात आहेत असे माओंना वाटू लागले. रशियात क्रांतिवादाचा लोप झाला असून तो पूर्णपणे सुधारणावादाच्या आहारी गेला आहे, तेथील नेतृत्व क्रांतीचा मार्ग सोडून सुरक्षिततेची वाट चोखाळत आहे, चीनमध्ये असे होऊ द्यावयाचे नाही, ही प्रवृत्ती वेळीच रोखायला हवी, क्रांतिवादावर चढणारी काजळी मधून मधून झटकून टाकायला हवी, त्यासाठी सांस्कृतिक क्रांतीची मोहीम एकदाच नव्हे तर दर सात आठ वर्षांनी करायला हवी असे माओचे मत होते. क्रांतिवाद विरुद्ध सुरक्षिततावाद हा त्याच्या मते मुख्य संघर्ष होता. माणूस सुरक्षिततेच्या मागे लागला की प्रगती खुंटते अशी त्याची धारणा होती. अखंड क्रांतीचे ते पुरस्कर्ते होते माणसामधल आणि मानव समाजामधल क्रांतिकारकत्व सतत जतन केल्याशिवाय मानव समाज विकासाचा पुढचा पायरी गाठू शकणार नाही, असं त्याना वाटत होतं. सुरक्षिततावादी मनोवृत्ती विकासाच्या मार्गातला अडसर आहे असे त्याना वाटे. त्याची ही विचारप्रणाली पूर्णांशानं बरोबर नसली तरी तीत काही प्रमाणात तथ्य आहे हे मान्य करायला हवं. नेहमीच्या व्यवहारातलं उदाहरण म्हणजे नोकरीतल्या सुरक्षिततेच. नियमित पगार, वर्षाला नियमित वाढ, वाढत्या जीवनमानानुसार वेतनश्रेणीत वाढ, निवृत्तीअखेर निवृत्तिवेतन, भविष्यनिधी या गोष्टींचा विचार नोकरी स्वीकारताना सर्वसामान्य माणसान करावा हे स्वाभाविक आहे. सरकारी नोकरी स्वीकारावी की खाजगी स्वीकारावी? की स्वतंत्र उद्योग-व्यवसायात पडावं याचा निर्णय घेताना बहुसंख्य माणसे सुरक्षिततेचाच विचार मुख्यतः करीत असतात. या विचारातूनच ते सरकारी नोकरी किंवा बऱ्यापैकी स्थैर्य असलेली खाजगी नोकरी पत्करतात. उद्योगव्यवसायाकडे वळणारे फार थोडे. कारण त्यात स्थैर्याची खात्री नसते. धोका पत्करायची तयारी लागते. कधी चांगली भरभराट होते तर कधी दिवाळे निघण्याचीही वेळ येते. यात सुरक्षितता नसते; पण तुमच्यातल्या साहसी वृत्तीला, कर्तृत्वाला आव्हान असतात. चाकोरीतलं जीवन आणि चाकोरीबाहेरील जीवन याच्यातला हा फरक आहे. माणसाच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी दोन्हीचा अनुभव त्याला हवा तसाच मानवसमाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सुरक्षितता आणि स्थैर्य हवं, तसंच संघर्ष आणि क्रांतीही हवी. प्रस्थापित सरकार उलथून पाडणं हा क्रांतीचा फार मर्यादित अर्थ आहे. कोणत्याही प्रस्थापित गोष्टी, मग ते सरकार असो, समाजव्यवस्था असो, मूल्यं असोत फार काळ चांगल्या स्वरूपात रहात नाहीत. त्यांना गंज, काजळी चढू लागते, विकृत स्वरूप येतं. सतत क्रांतीच करायला हवी असं नाही. आवश्यकता आहे ती क्रांतिवादी मनोवृत्ती टिकविण्याची. स्थैर्य, सुरक्षितता, सुखोपभोग याच्यातच माणूस गुरफटला जाऊन त्यात ही क्रांतिवादी मनोवृत्ती लोप पावणार नाही याची दक्षता घ्यावयास हवी. माओना चिंता वाटत होती ती ही. सांस्कृतिक क्रांती करून त्याना आपल्या पद्धतीने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यात अतिरेक झाले, ज्या रेडगार्डसच्या हाती माओनी सांस्कृतिक क्रांतीची मोहीम सोपविली, त्याच्याजवळ माओचा दृष्टी नव्हती, त्यामुळे वाइटाबरोबर काही चांगलेही नष्ट झाले; पण माओनी उपस्थित केलला प्रश्न मूलभूत स्वरूपाचा असून त्यावर मानवसमाजाला उत्तर शोधावा लागणार आहेत हे विसरून चालणार नाही.

आता नव्या नेतृत्वाच्या नव्या भूमिकेसंबंधी. आधुनिकीकरण हे त्याच्या साऱ्या कार्यक्रमामागाल मुख्य सूत्र आहे. शेती, उद्योग, विज्ञान, तंत्रशास्त्र, संरक्षण या क्षेत्रात हे आधुनिकीकरण होणार असून वीस वर्षात चीनला प्रगत राष्ट्राच्या बरोबरीला आणणं हे त्यामागचं उद्दिष्ट आहे. त्यासाठी नफ्याचं तत्त्व, स्पर्धा ही भांडवलशाही पद्धतीतली काही तत्त्वे नव नेतृत्व स्वीकारणार आहे व्यवस्थापनाबाबत कारखान्याच्या व्यवस्थापकांना अधिक स्वातंत्र्य दिले जाणार आहे. एवढ्यापुरतेच हे बदल मर्यादित आहेत, बाकी कम्युनिस्ट पद्धतीत काही फरक नाही. कम्युनिस्टपक्ष हा एकच पक्ष तेथे राहील. भाषणस्वातंत्र्य, विचारप्रकटनाचं स्वातंत्र्य यावर बंधने राहणारच आहेत. सरकारवर, कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणावर टीका करणारी भित्तीपत्रं 'डमॉक्रसी वॉल'-वर लावण्याची मोकळीक आता काढून घेण्यात आली आहे,

रशियाबद्दलच्या चीनच्या धोरणात काही फरक पडेल का? वास्तविक नव्या नेतृत्वाने माओवाद सोडल्यानंतर रशिया व चीनच्या कम्युनिस्ट विचारप्रणालीत फारसा फरक रहात नाही. तरीही त्याच्यात संघर्ष राहील. तो मुख्यतः आशियाच्या नेतृत्वाबाबत. आशियातील कम्युनिस्ट चळवळीच नेतृत्व आपकडं असलं पाहिजे, त्याबाबतीत रशियाच प्रभुत्व मान्य करायचं नाही असा चीनचा प्रयत्न आहे; पण व्हिएटनामच्या मार्फत आशियातही रशिया आपला प्रभाव वाढवत आहे. कापूचियातील युद्धात छोट्या व्हिएटनामनं चिनी सेनेचा पराभव केला हे लक्षात घेता चीनचा प्रभाव वाढण्याची भीती रशियाला वाटत नाही. उलट रशियाशीच संघर्षाची भीती चिनी नेत्याना वाटते. त्याला तोंड देण्यासाठी अमेरिकेची मदत चीन घेत आहे. □

# प्रीमियर कारखान्याला तोटा होणे अशक्य आहे. संपूर्ण व्यवहारांची न्यायालयीन चौकशी का नाही करीत ?

## –डॉ. दत्ता सामंत

गेल्या दहा-पंधरा वर्षांत मुंबईच्या कामगार आघाडीवर उदयाला आलेल्या नव्या कामगार-सम्राटांमध्ये डॉ. दत्ता सामंत यांचा समावेश होतो. घाटकोपरच्या पंतनगरात राहणारे डॉ. दत्ता सामंत हे आधी वैद्यकीय व्यवसायात होते. १९६५ च्या सुमारास योगायोगाने कामगार व अन्य नागरिकांच्या प्रश्नात लक्ष घालण्याची वेळ त्यांच्यावर आली व पुढे या क्षेत्रात ते इतके ओढले गेले की त्यांचा वैद्यकीय व्यवसाय ' डॉक्टर ' या नावापुरताच मर्यादित राहिला.

घाटकोपर कुर्ला परिसरातील झोपडपट्टीवासियांसाठी सुद्धा सुरुवातीच्या काळात त्यांनी बरेच काम केले. त्यातूनच ते राजकारणाकडे आले. १९६७ साली कॉंग्रेसच्या तिकिटावर ते विधानसभेत निवडूनही गेले होते. गेल्या लोकसभा निवडणुकीत इंदिरा कॉंग्रेसचे तिकिट त्यांना मिळते तर डॉ. सुब्रमण्यम स्वामींचा पराभव करून ते सहज निवडून आले असते. इंदिरा कॉंग्रेसचा पाठिंबा नसतानाही अपक्ष उमेदवार म्हणून उभे राहिलेले डॉ. सामंत सत्तर हजार मते मिळवू शकले ही बाब सर्वांनाच आश्चर्यकारक ठरली. पुढे मेमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत मात्र कुर्ला मतदार संघातून ते सहजपणी विजयी झाले. प्रीमियर, कॅडबरीज, वेलमन इंडिया, रिचर्डसन क्रुडास इ. मोठमोठ्या कंपन्यांमधील लाखो कामगारांचा हा नेता एका खुनाच्या कटाच्या आरोपाच्या संदर्भात अलीकडेच अटकेत होता. सध्याच्या औद्योगिक अशांततेच्या काळात या घटनेने डॉ. दत्ता सामंत पुन्हा एकदा प्रकाशझोतात आले. त्या निमित्ताने घेतलेली त्यांची ही एक मुलाखत.

**गेली अनेक वर्षे आपण कामगारक्षेत्रात आहात. आजमितीस आपल्या अनुयायी कामगारांची संख्या एकूण किती असेल ?**

– महाराष्ट्रात प्रामुख्याने मुंबई, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर तसेच गुजरातेत वापी इ. औद्योगिक भागात माझ्या नेतृत्वाखालील लहानमोठ्या संघटना काम करीत आहेत. माझ्या नेतृत्वाखाली विविध पाच हजार संघटनामध्ये एकूण पाच लाख कामगार माझे अनुयायी आहेत.

**आपल्या अनुयायांची संघटना असलेल्या एकूण किती कारखान्यात सध्या संप, टाळेबंदी, ले ऑफ वा तत्सम कारणापायी कामस्थगिती आहे ?**

– फक्त पंधरा किंवा वीस.

**कामगार व व्यवस्थापन किंवा मालक यांच्या दरम्यानचे अनेक संघर्ष आपण खेळला आहात सामान्यपणे अशा Dispute ची बीजे कोणत्या पार्श्वभूमीत आढळतात ?**

–गेल्या पंधरा-वीस वर्षांत आपल्याकडे पूर्वी अविकसित असलेल्या अशा प्रदेशात सुद्धा कारखानदारी मोठ्या प्रमाणावर वाढली. अविकसित भागात अनेक ठिकाणी उद्योजकांना स्वस्तात मजूर मिळत गेले. मुळातच ज्यांची वृत्ती पिळवणुकीची आहे अशा उद्योगपतींनी या परिस्थितीचा बरोबर फायदा उठविला आपल्या नफ्यात कामगारांचाही न्याय्य वाटा असल्याचे त्यांनी कधी जाणून घेण्याचा प्रयत्नच केला नाही. उलट सरकारी नियमातून पळवाटा शोधून वेगवेगळ्या मुद्द्यावर ते मजुरांना नाडत राहिले व त्यातून अनेक ताणतणाव निर्माण झाले. ठळकपणे सांगायचे झाल्यास उत्पादन व अनुषंगिक नफा वाढल्याबरोबर कामगाराचे वेतन वाढविण्यास उद्योगपतींचा नकार, बोनसबाबतची त्यांची अनुदार दृष्टी व अस्सल आणि सामर्थ्यवान कामगारसंघटनेस मान्यता देण्याची त्यांची टाळाटाळ यातून Labour Dispute निर्माण होतात.

**हे थांबविण्यासाठी तुमच्या मते नेमकी कशाची आवश्यकता आहे?**

सबंध कामगार व उद्योगविषयक कायद्याचाच फेरविचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. सरकारने किमान वेतन कायदा लागू केला, पण तो खूपच अपुरा ठरला. इतरही अनेक कायदे लागू केले; पण चलाख उद्योगपतींनी त्यातून पळवाटा शोधल्या व कामगार नाडले जाणे सुरूच राहिले ! प्रीमियरचेच उदाहरण पहा ना ! प्रीमियर गाड्यांना इतकी प्रचंड मागणी आहे व भाव इतके भरमसाठ वाढले आहेत की प्रीमियरला तोटा होणे अशक्य आहे; पण खोटे हिशेब सादर करून कंपनीचे व्यवस्थापक नेहमीच ' तोटा ' दाखवीत आले आहेत! तेव्हा हे थांबविण्यासाठी अशा प्रकारचा व्यापक कायदा हवा की सध्याच्या पळवाटा पूर्णपणे बुजल्या जातील !

अर्थात, नुसतेच कायदे उपयोगाचे नाहीत. कायद्याच्या अंमलबजावणीवर वचक ठेवणारी कामगारन्यायालये अधिक कार्यक्षम बनली पाहिजेत व त्यांची संख्याही वाढली पाहिजे. आज पन्नास हजाराहून अधिक खटले या न्यायालयातून पडून आहेत, तेव्हा न्याय देण्याची यंत्रणा नीटपणे तपासून आवश्यक सुधारणा केल्या पाहिजेत.

**प्रीमियर प्रकरण नेमके कुठे अडले आहे ?**

– आमच्या न्याय्य मागण्या मालक मान्य करीत नाहीत त्यामुळेच हे सर्व प्रकरण रेंगाळले आहे. १३ वर्षांपूर्वी आम्ही रोज २०

गाड्याचे उत्पादन देत होतो, आता हा आकडा ६५ वर गेला आहे. पूर्वी एका गाडीची किंमत १५ हजार होती ती आता ५५ हजार झाली आहे. एकीकडे हा फायदा वाढत असतानाच कामगाराची संख्या मात्र बारा हजारांवरून नऊ हजारांवर आली आहे. एवढं सगळं होऊनही १३ वर्षांत कामगारांचा पगार एकदाही वाढविण्यात आलेला नाही ! म्हणजे कंपनीचा नफा अगदी उघड असून सुद्धा हिशेबात मात्र तूट दाखविली जाते व अशा प्रकारे कामगारांच्या डोळ्यांत चक्क धूळ फेकली जात आहे. प्रीमियरच्या कामगाराना गिरणीकामगारापेक्षाही कमी महागाईभत्ता मिळतो. तेव्हा त्यातही वाढ व्हावी अशी आमची मागणी आहे. एकूणच गेल्या १३ वर्षांचा *हा जो प्रचंड आर्थिक गैरव्यवहार आहे त्याची संपूर्ण न्यायालयीन* चौकशी होण्याची नितांत गरज आहे. त्याशिवाय कामगाराना न्याय मिळेल असे वाटत नाही. अर्थात, न्यायालयीन चौकशीचा घोळ घालण्यापेक्षाही सरकारने कंपनी ताब्यात घ्यावी हे सर्वांत उत्तम !

या सर्व मागण्यांसाठी कंपनीचे दहा हजार कामगार माझ्या नेतृत्वाखाली लढत आहेत; पण असे असूनही कंपनी आमच्या संघटनेस मान्यता द्यायला तयार नाही.

**तुमची प्रीमियर प्रकरणातील बाजू न्याय्य असल्याचे अनेकांना मान्य आहे; पण त्यासाठी दहा हजार कामगारांची किती दिवस आर्थिक कुचंबणा होणार आहे ? मध्यमवर्गीय सामान्य कामगार यात होरपळले जातात त्यांचा विचार कोण करणार ?**

—अतिशय गरीब व गरजू कामगारासाठी वर्गणी काढून जे जे करता येईल ते ते आम्ही केले आहे; पण अखेर आमच्याही मर्यादा आहेत. कामगारांच्या मुलाना पुस्तके, कपडे इ. देणे वा छोटा-मोठा रोजगार मिळवून देणे यापेक्षा अधिक आम्ही काही करू शकत नाही आणि अखेर कुचंबणा होत असतानाही ती सोसण्याशिवाय खरोखरच काहीही गत्यंतर नाही. आधुनिक कामगार चळवळीची ही एक अपरिहार्यताच आहे.

**अलीकडच्या बातम्यांवरून प्रीमियर तंटा मिटण्याची चिन्हे दिसत आहेत का ? तुमचे काय मत ?**

—वाटाघाटी चालू आहेत; पण त्याबाबत तुम्ही अंतुल्यांना विचारणेच उपयुक्त ठरेल. अखेर मालक आमच्या मागण्या मान्य करतो की नाही यावर बरेचसे अवलंबून आहे.

**एके काळी आपण कॉंग्रेस, इंदिरा कॉंग्रेसबरोबर होतात आज आपली राजकीय जवळीक कोणाशी ?**

—कोणाशीही नाही. पूर्णपणे स्वतंत्र अशी माझी चळवळ आहे. कामगारांचाच एक स्वतंत्र पक्ष काढण्याच्या दिशेने मी विचार करीत आहे.

**इंटकशी आपले मतभेद झाले ते कोणत्या मुद्द्यांवर ?**

—एकूणच इंटकचे कामगारविषयक धोरण *मला नापसंत* आहे. कारखान्यात मान्यताप्राप्त कामगार संघटना ठरविण्यासाठी गुप्त मतदानपद्धतीइतका लोकतांत्रिक मार्ग दुसरा नाही; पण नेमका त्यालाच इंटकचा विरोध आहे !

**इतकी वर्षे आपण कामगारक्षेत्रात आहात. आपल्या नेमक्या achievements कोणत्या ?**

—मुंबईतील उपेक्षित कामगारांकडे मी प्रामुख्याने लक्ष दिले. गेल्या दहा-पंधरा वर्षांत मुंबईच्या उभारणीत ज्याचा वाटा आहे त्या १० ते १५ हजार खाणकामगारांना मी न्याय मिळवून दिला. पूर्वी त्यांना सात रुपये रोजंदारी मिळत असे आता ती वीस रुपयावर गेली आहे. म्हशीच्या तबेल्यांवरील कामगारासाठीही मी झगडलो. म्हशीचे मोर्चे काढले व कामगाराना पगारवाढ मिळवून दिली. माझ्या चळवळीमधून सामान्यातल्या सामान्य कामगाराला आपले exploitation समजू लागले आहे व तो त्याविरुद्ध आवाज उठवू लागला आहे.

**कामगारांनी पगारवाढीसाठी झगडणे हे अपेक्षितच आहे; पण *एवढी प्रचंड कामगार-शक्ती आहे, तिचा अन्य विधायक कामासाठी,* अन्य गोरगरिबांच्या उद्धारासाठी काही प्रयत्न आपल्या चळवळीतून झाले का ?**

—नाही. असं काहीही झालं नाही. मुळात आम्हाला वेळ कुठेय ? आणि आम्हीच काय काय करायचं ? सरकारने करावे की हे कार्य—

**शेवटचा प्रश्न ! ज्या खुनाबाबतच्या केसमध्ये आपल्याला अटक करण्यात आली होती त्याबाबत काही सांगू शकाल ?**

—*ते प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. या संदर्भात एकच सांगता* येईल की कुठे तरी व्यक्तिगत हेवेदावे वा अन्य कारणांमुळे निराशेने ग्रासलेले कामगार हिंसक प्रकार करतात. काहींचे बळीही पडतात; पण अशा क्षुल्लक प्रकारात लाखोंच्या कामगारसंघटनेस वा नेत्याला स्वारस्य असण्याचे कारणच नाही. तेव्हा नेत्याला जबाबदार धरणे योग्य नाही.

**—विनय सहस्रबुद्धे**


आवृत्ती संपत आली....

# जनांचा प्रवाहो चालिला

लेखक :
विनय हर्डीकर

मूल्य :
वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

उन्हाळयाची सुट्टी, कामाच्या वेळा, बांधकामे, शेती, खेळ-व्यायाम सर्वत्र....सर्व क्षेत्रात....

# अंधानुकरणी भारतीय

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

परवा एक एस. टी. ची नवीन बस पाहिली. टपापासून ते जमिनीपर्यंत जेवढे अंतर असते त्याच्या निम्म्यापर्यंत चौफेर फक्त काचा! मोठी डौलदार आणि ऐटबाज दिसत होती. अशा बसेस कुठे तरी पाहिल्यासारखे वाटले. युरोप-अमेरिकेत अशा बसेस असल्याचे चित्रात आणि सिनेमात पाहिल्याचे आठवले आणि मग वाटले, तिथले एक ठीक आहे. थंडी आणि पाऊस, ढगाळ हवा यामुळे सूर्यप्रकाशाला हपापलेले हे लोक रेल्वेडब्याच्या सुद्धा निम्म्यापर्यंत काचा बसवतात. त्यांचे आंधळे अनुकरण करून आम्ही भारतीय वर्षातले दहा महिने तळपत्या उन्हात या काचमहालातून कसा काय प्रवास करणार?

आणि मग लक्षात आले की, पाश्चात्य तेवढे चांगले या अंध समजुतीपायी आम्ही आमच्या देशकालपरिस्थितीचा विचार न करता अनेक गोष्टींचे अंधानुकरण करून विनाकारण नुकसान पत्करतो किंवा हास्यास्पद तरी ठरतो.

साधे केशभूषा आणि वेशभूषेचेच उदाहरण घ्या ना! युरोपमध्ये पुरुषांनी लांब केस वाढवायची फॅशन आली की, आमचे बडे बावळे तरुण लगेच लांबलचक केस वाढवू लागले. आता युरोपमधल्या थंड हवेत या केसांचा त्रास न होता फायदाच होतो. शिवाय त्यांच्या गोऱ्यापान चेहऱ्याभोवती कुरळ्या तांबूस केसांची महिरप शोभूनही दिसते. इथे मुंबईच्या उकडभट्टीत या 'घ-कुंतल' मंडळींना घामाने जीव कसा नकोसा होत नाही, याचे आश्चर्य वाटते आणि काळ्या सावळ्या चेहऱ्याभोवती काळ्या काळ्या केसाचे जंगल आकर्षक दिसण्याऐवजी भयानक दिसते.

कपड्यांची तीच तऱ्हा. परदेशात टाइट पँट की भारतात टाइट पँट! मग इथल्या हवामानाला, धावपळीला ती किती का गैरसोयीची असेना! तशी ना वापरणारा जुनाट! मुंबईच्या एका क्रिकेट-शिक्षकाने टाइट पँट घालून येणाऱ्या मुलांना परत पाठवले होते. चागला खेळ होण्याकरता आवश्यक त्या शरीराच्या हालचाली जर कपड्यामुळे तुम्ही करू शकणार नसाल तर तसले कपडे निदान तो खेळ शिकताना तुम्ही घालता कामा नये; पण उलट मुंबईच्या फॅशनेबल पोरांनी त्या शिक्षकाविरुद्धच गहजब केला. पुढे फॅशन बदलली आणि टाइट पँटकरता जीव टाकणारी हीच पोरे घंटाघोळ आणि हत्तीघोळ विजारी वापरू लागली. कारण काही नाही, केवळ परदेशी फॅशनचे अंधानुकरण!

मुंबईच्या भर उन्हात गरम सूट, टाय, बूट असा पोषाख करून जाणारे 'देशी साहेब' अद्यापही पाहायला मिळतात. काही पाश्चात्य कंपन्यांत आणि अगदी आपल्या काही राष्ट्रीय बँकांतही त्यांच्या साहेबलोकांना टाय वापरण्याची सक्ती असते. पाश्चात्यांच्या वृथा अनुकरणाचा हा गळफास अजून आमच्या मानेभोवतालचा सुटत नाही!

याउलट इथे येणारे परदेशी पाहुणे पहा. त्यांना इथला उन्हाळा सोसत नाही, तर चतकोर विजार, एखादा टी शर्ट आणि पायात चपला अशा कपड्यात ते सर्वत्र वावरत असतात.

केशभूषा, वेशभूषा याबाबतीत केलेल्या पाश्चात्यांच्या अनुकरणाने फार तर थोडी गैरसोय आणि थोडा जास्त खर्च होत असेल; पण इमारती बांधण्याच्या क्षेत्रात जेव्हा आम्ही असे अंधानुकरण करतो तेव्हा मात्र देशाचे कोटयवधी रुपये नुकसान होते. आजकाल सर्वत्र लक्षावधी रुपयांची बांधकामे सिमेंटअभावी खोळंबून पडली आहेत. जणू सिमेंटशिवाय अन्य काही बांधकामाला उपयुक्त वस्तूच नाहीत! ताजमहालापासून रामेश्वरमंदिरापर्यंत अजस्र शिल्पे सिमेंटशिवायच बाधली गेली ना? नुकतीच मुंबई येथे वास्तुरचना-तज्ज्ञांची परिषद झाली. त्यातल्या एका परदेशी प्रतिनिधीने विचारले, 'या मुंबई शहरात नेहमी मोठमोठे भूकंप होतात का?' 'छे:! इथे तर कधीच भूकंप होत नाहीत.' असे उत्तर मिळताच त्याने आश्चर्याने विचारले, 'मग इतके महाग पोलाद आणि सिमेंट वापरूनच इथल्या सर्व इमारती का बांधल्या जातात?' उत्तर साधे आहे. इथली परिस्थिती, कच्चा माल आणि इतर सुविधा यांचा विचार करून त्यातून योग्य मार्ग काढण्याइतकी स्वतंत्र बुद्धी इथे कोणापाशी नाही म्हणून! त्याशिवाय का परदेशातल्या कॉंक्रीट आणि काचाचे ठोकळे उभारण्याची आम्ही नक्कल करत राहिलो असतो? या ठोकळ्यांतूनही आपल्या हवामानाला योग्य होईल असा बदल म्हणजे तिरक्या 'हवामान फळ्या' (Wether Fins) इमारतीच्या बाहेर काढायच्या, म्हणजे उजेड आणि वारा येतो; पण ऊन आणि पाऊस येत नाही, ही कल्पनाही काढली प्रथम एका परदेशी कपनीने! Stan-Vac Building ही इमारत मुंबईत Standard Vaccum या कंपनीने बाधली त्या वेळी! मग आम्हीही तसे करू लागलो. ३०–४० मजली इमारती स्टील आणि सिमेंटनेच बांधाव्या लागत असतीलही कदाचित; पण लहान गावातले एक-दोन मजली घरे बांधणारे लोकही आजकाल 'कॉलम-बीम्स' शिवाय बात करत नाहीत. ही घरे उन्हाळ्यात तापतात, हिवाळ्यात गार पडतात आणि पावसाळ्यात गळतात! याकरता 'हॉलो ब्लॉक' वगैरेसारख्या कल्पना कोणी काढल्या तर आमचे पाश्चात्यानुकरणी वास्तुशिल्पकार

त्या ह्मणून पाडतात; पण याच परदेशातून इकडे आल्या तर त्या डोळे झाकून मान्य करतात.

मुंबईत तुम्ही कोणाच्या घरी गेलात तर (दिवसा तरी) तुम्हाला बहुधा हवाबंद बाटलीतले पेय दिले जाईल. कोकाकोला, फँटा वगैरेसारख्या बाटल्या घरी फ्रीजमध्ये कायम डझनावारी ठेवणे ही मुंबईत प्रतिष्ठेची गोष्ट मानली जाते. आता या अत्यंत महागड्या आणि बऱ्याच वेळा बेचव पेयात कृत्रिम गोडी, कृत्रिम रंग, कृत्रिम चव याशिवाय काहीही असत नाही. देणाराला आणि घेणाराला ते ठाऊक असते. त्यापेक्षा वाळयाचे सरबत किती सुरेख लागते! किंवा शुद्ध ताज्या लिंबाचे सरबत! आपले कोकम-सरबत तर कुठल्याही फ्रेंच वाइनच्या तोंडात मारील. अगदी पावसाळयाचे पाणी किंवा ईव्हन नीरासुद्धा त्या बाटलीबंद पेयापेक्षा शंभरपटीनी श्रेष्ठ होय! आता दूध मुबलक मिळते; पण पाहुण्याच्या लहान मुलानाही कुणी चिल्ड् दूध दिल्याचे दिसत नाही.

धूम्रपानाच्या बाबतीत तसेच. सिगारेटमुळे कॅन्सर होण्याची शक्यता असते. हा कॅन्सर होण्याला सिगारेटमधील तंबाखूपेक्षा सिगारेटवरचा पांढराशुभ्र कागद जास्त जबाबदार असतो. त्यामुळे भारतीय बिडी ही सिगारेटपेक्षा कमी धोक्याची, शिवाय स्वस्त. जास्त लोकाना काम मिळवून देणारी. परदेशी कंपन्यांना खिसे भरायला मदत न करणारी; पण बिडी ओढणे ही हलक्या दर्जाच्या लोकाचे लक्षण मानले जाते. कारण काही नाही. परदेशी लोकांचे आंधळे अनुकरण! सर्वांत आदर्श म्हणजे हुक्का; पण तो पिणे एखादा काकाजीच जाणे!

### व्यायाम आणि खेळ

व्यायामाच्या बाबतीत असेच. वास्तविक पळणे, पोहणे, लांब चालणे, सूर्यनमस्कार, योगासने, जागचे जागी पळणे, दोरीवरच्या उड्या असे सोपे, बिनखर्चाचे भारतीय व्यायामप्रकार उपलब्ध असताना आम्ही अफाट किंमत देऊन शॉकॲबसॉर्बरसारखी स्प्रिंगची व्यायामसाधने विकत घेतो ते या अंधानुकरणाच्या वेडापायीच की नाही? या व्यायामसाधनांनी शरीरावर झालेला परिणाम तात्काळ दिसू लागतो; पण तो तितकाच तात्काळ विरघळतोही! आजकाल तर दर महिन्या-दोन महिन्यांनी असल्या नवीन व्यायाम-साधनांच्या जाहिराती झळकतात. त्यामागचे तत्त्व एकच असते; पण नवीन नवीन बकरे या मोहक जाहिरातीना फशी पडतातच.

खेळाच्या बाबतीत तीच गोष्ट. क्रिकेटसारख्या खेळाकरता आम्ही किती वेड व्हावे याला काही सीमा! आता इंग्लंडमध्ये रोज थोडा तरी पाऊस पडतो. त्यामुळे कायम हिरवळ असते. तिथे अंगभर कपडे, स्वेटर, पॅडस्, ग्लोव्ज एवढा जामानिमा करून तासन् तास खेळायला काही वाटत नाही. इथे मुंबईच्या रणरणत्या उन्हात अशा पोशाखातले बहाद्दर खेळायला निघतात तेव्हा त्यांची कीव येते. शिवाय या खेळाकरता खास हिरवळ जोपासायची. (मग इतरत्र पिण्याच्या पाण्याची टंचाई असली तरी चालेल!) मोठाले स्टेडियम बांधायचे, साइट स्क्रीन उभारायचे, रेडिओ आणि टी. व्ही. वर सामना प्रसारित करायचा, काय न् काय! आणि हे फक्त क्रिकेट-करता. खोखोचा खेळ काय चापल्यपूर्ण आणि विद्युत्‌गतीच्या प्रतिक्षिप्त क्रिया आवश्यक असणारा नसतो? पण तो कधी टी. व्ही. वर पाहिलेला फारसा आठवत नाही.

इंग्लंडमधल्या पावसावरून आठवली आमच्या आकाशवाणीची हवामानवृत्ताबाबतची अंधानुकरणप्रियता! इंग्लंडमध्ये हवामान तासातासाला बदलते, म्हणून तिथल्या रेडिओवर वारंवार हवामानाचे अंदाज सांगितले जातात. तीच तऱ्हा आम्ही नकळून चार चार महिने नुसते 'हवा कोरडी राहील. रात्रीच्या तपमानात थोडी घट होईल' असे वारंवार ऐकवत रहायचे, हे कशाकरता?

पाश्चात्यांच्या अनुकरणाप्रमाणेच त्यानी लादलेल्या काही अतिशय गैरसोयीच्या गोष्टी आपण अद्याप तशाच चालू ठेवतो आहोत याचेही आश्चर्य वाटते. ब्रिटिश साहेब इथे अधिकारी असत त्या वेळी सध्याकाळी टेनिस, मग क्लबमध्ये पेयपानासहित गप्पा, मग जेवण, मग ब्रिज असा कार्यक्रम चाले. साहजिकच दुसऱ्या दिवशी लवकर उठणे शक्य होत नसे. कार्यालयाची वेळ त्यामुळेच साहेबाच्या सोयीकरता ११ ते ५ ठेवावी लागे. त्याबरोबर इतर सर्व ठिकाणी—शाळा, कॉलेजे, बँका, व्यापारी कंपन्या यातून ११ ते ५ हीच वेळ अवलंबिली जाई. आता भारतासारख्या उष्ण प्रदेशात माणसाची कार्यक्षमता सर्वात कमी केव्हा असते? तर ती दुपारच्या उन्हाच्या वेळी!' म्हणजे सकाळी ७ ते १ किंवा ६ ते १२ ही कामाला सर्वात योग्य वेळ. दुपारी विश्रांती घेणे आवश्यक भासावे अशीच आपल्याकडे नेहमी हवा असते; पण याच वेळात कामे करावी लागत असल्याने कोणी पेंगत असतात, कोणी चक्क झोपा काढतात, कोणी एकसारखे चहाला पळतात! विद्यार्थी तर बिचारे या वेळात कंटाळवाणे विषय एकामागून एक कसे सहन करतात हेच आश्चर्य! कामाच्या आणि अभ्यासाच्या वेळा वरीलप्रमाणे बदलल्यास कार्यक्षमता दीडपटीने तरी वाढेल.

तीच गोष्ट उन्हाळयाच्या सुट्टीची. साहेबमजकुरांना इथला उन्हाळा सहन होत नसल्यामुळे ते दीर्घ सुट्टी घेऊन थंड हवेच्या ठिकाणी जात. साहजिक शाळा–कॉलेजाना त्याच वेळी दीर्घ सुट्टी दिली जाई. म्हणजे परीक्षा ऐन मार्च–एप्रिलमध्ये घेणं भाग पडे. या मोसमात सतत अभ्यास करणे, जागरणे करणे, परीक्षेकरता लक्ष एकाग्र करणे किती अवघड असते याचा सर्वांनाच अनुभव आहे. खुद्द इंग्लंडमध्ये सुद्धा मार्च-एप्रिल महिन्यात परीक्षा घेत नाहीत; पण आम्ही मात्र गोऱ्या साहेबाने मागे लावलेले 'शुक्ल काष्ठ' अजून सोडायला तयार नाही!

अशीच गोष्ट शाळा–कॉलेजच्या सत्राची. आपल्या देशात बहुसंख्य लोक शेतीव्यवसायात गुंतलेले आहेत. त्यांच्या मुलाना शेताच्या कामात मदत करावीच लागते. त्यांच्या सोयीनुसार त्याना शाळेत येता येईल असे वेळापत्रक आपण आठवू शकणार नाही का? इथही ११ ते ५ चे भूत मानगुटीवर कशाला? त्यामुळे कित्येक मुले शाळेत जातच नाहीत! गेली तर गैरहजर रहातात वा मध्येच शाळा सोडून देतात! तीच गोष्ट सुट्ट्यांची! शेतात कामाची गर्दी असते अशा वेळी शाळाना दीर्घ मुदतीच्या सुट्ट्या हव्यात. मग त्या त्या प्रदेशानुसार त्या वेगवेगळया हंगामात आल्या तरी चालतील.

### स्वदेशी शिक्षण

खुद्द शिक्षणक्रमाच्या बाबतीत तर आपण ब्रिटिश विद्यापीठांनी कित्येक दशकापूर्वी तयार केलेले अभ्यासक्रम अद्याप जसेच्या तसे शिकवतो आहो. मग ते पूर्ण केल्यावर प्रत्यक्ष जीवनात त्याचा विद्यार्थ्याला काहीएक उपयोग न का होईना! वास्तविक ज्या देशातले ७०% लोक शेतीवर अवलंबून आहेत तिथले ७०% अभ्यासक्रम शेती वा अनुषंगिक विषयाचे हवेत. म्हणजे निदान प्रत्येक तालुक्यात ४–५ शेतकीशाळा हव्यात. आमच्याकडे शेतकी विद्यापीठे भरपूर. 'शाळा' मात्र नाहीत! आणि या विद्यापीठाचा अभ्यासक्रम शिकून पदवीधर झालेल्या एखाद्या माणसाचे शेत आणि शेजारचे अडाणी ग्यानबाचे शेत यात काही फरक दिसतो असे याटते काय तुम्हाला? फरक असतो तो म्हणजे ग्यानबाचेच शेत बऱ्यापैकी पिकलेले असते! दुग्धनिर्मिती, कुक्कुटपालन, मच्छीपालन, मेषपालन, रेशीमकिडे, मधमाश्या, खताचा वापर, यांत्रिक मशागत, ट्रॅक्टरदुरुस्ती याचे कोर्सेस गावोगाव पाहिजेत. आमच्या गावात वा जवळपास यातला एकही नाही. तुमच्या गावात आहे? आमचा अडाणी शेतकरी सुद्धा हरितक्रांती, धवलक्रांती आणि शर्कराक्रांती करून दाखवतो त्याला या विषयाचे शास्त्रोक्त ज्ञान उपलब्ध करून दिले तर तो खरोखर बाकी जगाला पुरेल एवढे अन्नधान्य निर्माण करून दाखवील; पण गावोगाव देणग्या गोळा करून निघताहेत वाणिज्य आणि मानव्य महाविद्यालये! खेड्यातली मुले इथे शिकायला येतात. पदवीधर होतात. मग त्यांना बाहेर नोकरीही मिळत नाही आणि पुन्हा शेतावर जाऊन कष्ट करायची इच्छा होत नाही. मग रहातात नुसतेच सुशिक्षित बेकाराची संख्या फुगवत!

शिक्षणाइतकेच महत्त्वाचे ऊर्जेचे क्षेत्र आहे. तिथेही आपण अद्याप स्वतंत्र बुद्धीने आपल्या देशाच्या परिस्थितीनुसार विचार करत नाही. पश्चात्याप्रमाणेच आपणही खनिज तेले आणि वीज याचाच अट्टाहास धरून बसतो. वास्तविक भारतात भरपूर आणि विनामूल्य उपलब्ध असणाऱ्या सौरशक्तीचा वापर कसा करून घेता येईल याबाबत आपण थोडे जरी संशोधन केले तरी वीज आणि खनिज तेले याकरता खर्च होणारे कोट्यवधि रुपये आपण वाचवू शकू. तीच गोष्ट गोबर गॅसची! अद्याप भारतातल्या लक्षावधी खेड्यातले कोट्यवधी लोक जळणाकरता लाकूडफाटा आणि शेणगोवऱ्या वापरतात. याच शेणाचा गॅस बनवला तर वातावरण दूषित न करणारे इंधन गॅसरूपाने मिळते, शेतीला उत्तम दर्जाचे सेंद्रिय खत मिळते आणि लाकूडफाट्याकरता नष्ट होणारी वनसंपत्ती वाचते. त्यामुळे वातावरण आणखी शुद्ध रहाते. रासायनिक खताचा खर्च आणि त्यामुळे जमीन बिघडणे कमी होते. अशी ही गोबरगॅसरूपी कामधेनू आहे; पण या गोष्टी करता प्रचार करायचे सोडून आमचे संत–महंत नुसते गोवधबंदीकरता जीव टाकत असतात! या मरतुकड्या गाईंचे तांडे वाचवून उपयोग काय?

मुंबईत दरवर्षी पाण्याची टंचाई भासते. पाचगणीला M. R. A. संस्थेचे केंद्र आहे. तिथे छपरावर पडणारे पावसाचे पाणी जमिनीखालच्या टाकीत पद्धतशीरपणे साठवून पुढे वर्षभर अगदी पिण्यासाठीही वापरतात. मुंबईत पडणारे पावसाचे पाणी गटारातून वाहून समुद्राला मिळते. ते असे साठवून निदान बागकामाला किंवा मोटारी धुवायला वापरता येणार नाही का? खोपोलीजवळच्या अनेक खेड्यात परदेशच्या रोटरी क्लबज्नी मदत करून नलिकाकूप खणून पाणीटंचाई दूर केली आहे इतरत्र हे का जमू नये?

पवनचक्क्या उभारून वाऱ्याचा उपयोग करून घेणे, समुद्राच्या भरती–ओहोटीवर चालणारी जनित्रे वापरून वीज तयार करणे, देशात भरपूर प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या कोळशाची प्रत सुधारून ऊर्जेचे प्रमाण वाढवणे, केरळच्या किनाऱ्यावर टनावारी सापडणाऱ्या वाळूतील थोरियमवर आधारित अणुशक्तीचा विकास करणे या काही फारशा अवघड गोष्टी नाहीत; पण जागतिक बँकेचे शिष्टमंडळ येऊन त्यांनी पहाणी करून अनुकूल अभिप्राय दिल्याशिवाय आपण आपल्या बुद्धीने काही करायचेच नाही असा जणू आपण पण केलेला दिसतो!

लोकमान्य टिळक आणि महात्माजी स्वदेशीचे महत्त्व पटवायचा प्रयत्न करीत तो केवळ देशी वस्तू वापरण्याचा हट्ट नव्हता तर कुठल्याही प्रश्नाचा विचार आपल्या देशाच्या संदर्भात करण्याचा विचार होता. त्यानुसार जनतेने आणि सरकारने योग्य ती पावले उचलायला हवीत. □


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.- –डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. प. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.




लेखकाच्या मध्यपूर्वेतील
मनमुराद भटकंतीवर
व
इराणमधील वास्तव्यावर
आधारलेली वेगळी
लेखमाला

□

लेखांक सातवा

# नादिरशहा आणि नंतर....इराणची लूट

इस्फहानमध्ये येऊन आठवडा उलटला होता. अहमदाबाद ह्या खेड्यामध्ये पाहिलेल्या सोमनाथच्या शिलेनं मनात माजवलेली खळबळ अजून शांत होत नव्हती. सर्फराझ देखील काहीसा नरमच होता. त्याला 'सर्मा खुर्दी' झालं होतं. म्हणजे झालं काहीच नव्हतं; पण 'तब्येत जरा बरी नाही' अशातला प्रकार. इराणी लोकांना घर सोडून आठवडा लोटला की, हमखास 'सर्मा खुर्दी' होतं आणि मग ते 'कोर्स'–म्हणजे औषधाच्या रंगीबेरंगी गोळ्या गंभीर चेहऱ्यानं गिळत राहतात. बरं, ह्या गोळ्या डॉक्टरच्या सल्ल्यानं नव्हे तर केमिस्टच्या दुकानात जाऊन स्वतःच्या डोक्यानं आणि केमिस्टच्या सल्ल्यानं विकत घेतलेल्या. औषधाच्या गोळ्या गिळायची ह्यांना प्रचंड हौस! एखाद्याला 'सर्मा खुर्दी' झालं की, इतरांनी त्याची वारंवार काळजीपूर्वक चौकशी करण्याची आणि आपल्या-जवळील औषधाच्या गोळ्या त्याला 'ऑफर' करण्याची प्रथा देखील आहे. मला चुकून शिंक आली तरी हैदरी पटकन विचारा-यचा 'आगा-ए-विजे, शुमा सर्मा खुर्दी?' जणू त्याला म्हणायचं असावं सर्फराझ बरा झाला की, माझी पाळी, तेव्हा तू मधेच शिंकू नकोस! 'सर्मा खुर्दी'चा आहारावर मात्र अजिबात परिणाम व्हायचा नाही. उलट दर दोन-तीन तासांनी मोठा ग्लास भरून गरम गरम दूध वगैरे पिण्याचा सपाटा चालू व्हायचा. जेवणाच्या वेळी तब्येत गरम एरवी नरम अशा प्रकारचा हा आजार!

आठवड्याभरात इस्फहानच्या आजुबाजूची वीस-पंचवीस खेडी पालथी घालून झाली होती. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर जागोजागी दिसत होता. प्रत्येक खेड्यात ट्रॅक्टर्स, शेतीची इतर यंत्रं नजरेस पडत होती. अनेक घरांवरचे टी. व्ही. अँटिना इराण आधुनिक होत असल्याची साक्ष देत होते. इस्फहानच्या आजुबाजूचा मुलूख खूपसा समृद्ध. जमीन सुपीक. इराणी सामान्य शेतकऱ्याचं राहणीमान हे आपल्या सामान्य शेतकऱ्यापेक्षा खूपच बऱ्या दर्जाचं आहे, हे वारंवार जाणवत होतं. त्याचं जीवनमान आणखी उंचावण्याचा जोरदार प्रयत्न इराणी सरकार करत होतं आणि तरी देखील कुठं तरी काही तरी चुकत होतं. सामान्य शेतकरी म्हणावा तसा सुखी भासत नव्हता. माझं एक मन म्हणत होतं, 'रमझानचे रोझे चालू आहेत त्यामुळं सगळे गंभीर चेहरे करून वावरत आहेत', तर दुसरं

घन म्हणत होतं 'चेहऱ्यावर दिसतंय ते गांभीर्य नाही. ती नाराजी आहे. शतकानुशतकाची—रमझानचा आणि ह्या खोल सलत असलेल्या दुःखाचा काही संबंध नाही.' मला मूळ समजत नव्हतं आणि सात-आठ दिवसाच्या अनुभवातून ते सापडावं अशी अपेक्षा करणं वेडेपणाचं होतं. समजेल तेव्हा समजेल; तोपर्यंत दिसेल ते पाहायचं असं मी ठरवलं होतं. आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतीच्या सुधारित पद्धती आत्मसात करण्यास सामान्य शेतकऱ्याला काही वेळ लागणार होता, त्या सवयी अंगवळणी पडण्यास काही काळ जाणं आवश्यक होतं; पण आपल्या देशानं युरोप-अमेरिकेची बरोबरी करावी म्हणून घाई झालेला शहेनशहा इराणी शेतकऱ्याला जरूर तेवढा अवधी देण्यास राजी नव्हता. शहेनशहाचं म्हणणं होतं—एकदा शेतीसाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री, बी-बियाणं, खतं-औषधं आणि पाणी ह्या गोष्टी शेतकऱ्याला दिल्या की, त्यानं झटपट प्रगती केलीच पाहिजे. जुलुमजबरदस्तीनं प्रगती होत नाही; पण शहेनशहा ते मानायला तयार नव्हता. शतकानुशतके काही विशिष्ट पद्धतीनं शेती करण्याची सवय असलेला इराणी शेतकरी सुधारणांच्या माऱ्यानं संपूर्णपणे बावचळून गेला होता. इराणमधील जमीनदारीचा इतिहास जाणून घेण्याच्या इच्छेनं मी सर्फराझला विचारलं—'हे लाटसाहेब कोण?—हे बडे जमीनदार एकेक खेड्याचे संपूर्ण मालक कसे काय झाले?'

एक लांबलचक सुस्कारा सोडत काहीशा वैतागलेल्या स्वरात सर्फराझ म्हणाला,

'अरे बाबा, एक खेड्याचे नव्हे, हे लाटसाहेब शंभर शंभर खेड्यांचे मालक होते आणि अजूनही आहेत; पण ते सगळं किचकट आहे. नंतर कधी तरी समजावून सांगीन.'

'सर्मा खुर्दी' मुळं सर्फराझ नाराज असावा. मी मग जास्त प्रश्न विचारून त्याला जास्त सतावलं नाही. आम्ही हॉटेलवर येऊन पोहोचलो तेव्हा खोलीत शिरण्याअगोदर सर्फराझ म्हणाला, 'रात्री मिस्टर दारवंदीकडे जेवणास जायचं आहे, लक्षात आहे ना तुझ्या? शॉवर घेऊन फ्रेश हो. अर्ध्यापाऊण तासात निघू या!'

—गाडी दारवंदीच्या घराच्या दिशेनं चालली होती. मी सहज सर्फराझला विचारलं, 'अरे, शहेनशहा आयमिहरचं नाव मोहम्मद रेझाशा, त्याच्या वडलाचं नाव रेझाखान; पण रेझाखानच्या बापाचं नाव काय?'

माझा प्रश्न ऐकून हैदरी खुदुखुदु हसू लागला. सर्फराझनं त्याला दाटलं आणि गंभीर चेहऱ्यानं मला म्हणाला, 'तुला एक किस्सा सांगतो. ऐक—

## नादिरशहाचे 'कुळ'

नादिरशहानं हिंदवर हमला करून दिल्ली जिंकली. कुही-नूर, मयूरसिंहासन आणि इतर अमाप जडजवाहिरात त्यानं ताब्यात घेतली. दिल्लीच्या पराभूत बादशहाचा पाहुणचार घेत असताना एकदा त्याची मुलगी नादिरशहाच्या नजरेस पडली. नादिरशहाला ती अतिशय आवडली. दिल्ली सोडण्याअगोदर नादिरशहानं दिल्लीच्या बादशहाला निरोप धाडून मुलीची मागणी केली. नादिरशहा सामान्य कुळात जन्मलेला—त्याच्या बापाचं नाव देखील कुणाला माहीत नव्हतं—सैन्यातील एक मामुली शिपाई असलेला नादिर कुल्ली स्वत:च्या मनगटाच्या ताकदीवर इराणचा शहा झाला होता. दिल्लीच्या बादशहानं निरोप आणलेल्या सरदाराला सांगितलं, 'मुलगी देण्यास माझी काहीच हरकत नाही; पण नादिरशहाच्या घराण्याविषयी, कुळाविषयी काही माहिती समजली तर बरं.' सरदार नादिरशहाकडे परतला. दिल्लीच्या बादशहाचा निरोप त्यानं नादिरशहाच्या कानावर घातला. नादिरशहा गदगदून हसला. त्यानं सात नंग्या तलवारी बादशहाकडे पाठविल्या आणि सांगितलं—'पहिली तलवार म्हणजे माझा बाप, दुसरी तलवार म्हणजे माझा आजा, तिसरी म्हणजे पणजा, चौथी म्हणजे खापरपणजा....तलवार हेच नादिरशहाचं घराणं!' दिल्लीच्या बादशहानं ताबडतोब आपली मुलगी नादिरशहाकडे रवाना केली हे सांगण्याची जरूर नाही.'

माझ्या प्रश्नाला हा किस्सा सुनावून सर्फराझनं चपखल उत्तर दिलं होतं. मी मनातल्या मनात त्याच्या बुद्धिमत्तेला आणि हजरजबाबीपणाला दाद दिली आणि गप्प बसून राहिलो. काही क्षणानंतर सर्फराझच सांगू लागला—

'अरे, ह्या नादिरशहाला जंग-लढाई भयंकर प्रिय. हा सतत कुणा ना कुणावर हमला करत असायचा. चोवीस तास रणांगणावर असायचा. धर्म वगैरेवर त्याची विशेष निष्ठा नव्हती. तलवार हाच त्याचा धर्म. नमाझ वगैरे कधी तरी पढायचा. एकदा एका मुल्लानं त्याला सल्ला दिला की, दिवसातून पाच वेळा नमाझ पढल्यास त्याला स्वर्गप्राप्ती होऊन पृथ्वीपेक्षा मोठं साम्राज्य मिळेल. नादिरशहानं मुल्लाला विचारलं—'स्वर्गाच्या साम्राज्यात लढाया होतात की नाही?' मुल्ला म्हणाला, 'स्वर्गात नुसतं सुख आणि आनंदीआनंद. तिथं लढाया नाहीत—मग तिथं आनंदीआनंद असणं कसं शक्य आहे?' आणि त्यानं मुल्लाला हाकलून लावलं.'

एक सफाईदार वळण घेऊन हैदरीनं गाडी एका भव्य मॉडर्न बंगल्याच्या पोर्चमध्ये उभी केली. सुटाबुटातील दारवानानं अदबीनं गाडीचा दरवाजा उघडला. प्रसन्न चेहऱ्यानं सलाम आलेकुम करून बंगल्याच्या मुख्य दरवाजापर्यंत मार्गदर्शन केलं. इराणमध्ये कुठल्याही ऑफिसात किंवा 'बड्या' व्यक्तीच्या घरी जाण्याअगोदर मख्ख चेहऱ्याचे, पिस्तुलधारी उर्मट गार्ड बघून मला सवय झाली होती. हा अनुभव एकदम निराळा होता. मिस्टर दारवंदी हे इराणमधील एक धनाढ्य कारखानदार. इस्फहानमध्ये त्यांच्या अनेक कापड-गिरण्या होत्या. सर्फराझनं त्यांच्याविषयी मला थोडीफार कल्पना देताना सांगितलं होतं की, मिस्टर दारवंदी एक जिंदादिल व्यक्ती आहे; पण त्याची प्रचीती सलामीलाच मिळेल अशी माझी अपेक्षा नव्हती.

आम्ही दारावरची बेल दाबणार इतक्यात दार उघडून स्वत: मिस्टर दारवंदीच आमच्या स्वागतासाठी सामोरे आले. सर्फराझची आणि त्याची जिगर दोस्ती असावी. दोघांनी एकमेकाना कडकडून मिठी मारली, एकमेकाच्या गालाची अनेक चुंबनं घेतली आणि मग माझ्याशी जोरजोरानं शेकहँड करीत वारंवार 'वेलकम्—वेलकम्' असं म्हणत तिशी—पस्तिशीच्या वयाचे मिस्टर दारवंदी दिलखुलास हसत म्हणाले, "माझं नाव लुम्फी—तुझं काय?"

सर्फराझला आणि मला आत नेण्याअगोदर लुम्फीनं हैदरीला हाक मारून बोलवलं. काही प्रश्न विचारले. गार्डला हैदरीची 'बडदास्त'

राखण्याच्या सूचना दिल्या. हैदरी ह्या कानापासून त्या कानापर्यंत हसत वारंवार " खैली मामनून कुर्बान–खैली मामनून " ( धन्यवाद महाराज–धन्यवाद ) म्हणत होता.

लुम्फीचा दिवाणखाना म्हणजे ' इंटीरियर डेकोरेशनचा ' अप्रतिम नमुना. अतिशय कलात्मक सजावट. सौम्य रंग, नाजूक पण आरामशीर बसता येण्यासारखं फर्निचर, कुठंही श्रीमतीचं बटबटीत प्रदर्शन नाही आणि तरीदेखील अतिथीला ' ह्या दिवाणखान्याचा मालक गबरू आहे, त्याला सौंदर्यदृष्टी आहे-' टेस्ट ' आहे, याची सतत जाणीव रहावी म्हणून अतिशय कौशल्याने जागोजागी वैभवाचं प्रदर्शन.

आगा-ए नामाशी देखील धनाढ्य होते. कदाचित लुम्फी दारबंदीपेक्षा ते श्रीमंत असतील; पण त्याचा दिवाणखाना आणि लुम्फीचा, ह्यातला फरक ' सांस्कृतिक ' म्हणावा असा. फार थोड्या श्रीमंतांना अशी सौंदर्यदृष्टी असते.

आम्ही दिवाणखान्यात विसावतो न विसावतो इतक्यात लुम्फीची बायको जेनी आणि ' मॉदरजॉन '–आई, जिना उतरून प्रवेश करत्या झाल्या. जेनी अमेरिकन–ती एक साधा स्कर्ट–ब्लाऊज घालून होती. दिसायला साधारण. लुम्फीची ' मॉदरजॉन ' ( म्हणजे मदरजान-प्राणप्रिया माता ) साठीच्या घरातील मिष्किल हसऱ्या चेहऱ्याची आणि ' चादोर ' ( इराणी इस्लामी बुरखा ) पांघरलेली. ओळखीपाळखी झाल्या. सर्फराज़न लुम्फीच्या आईला आपलं ' सर्माखुर्दी ' प्रकरण ऐकवलं. तिनं लगबगीन उठून एका बारक्या पेल्यातून त्याला कसला तरी काढा प्यायला आणून दिला. तोपर्यंत लुम्फी व्हिस्कीचे ग्लास घेऊन आला.

बराच वेळ सर्फराज आणि लुम्फी फार्सीमध्ये बोलत होते. मध्येच लुम्फी म्हणाला,' विजय, थोडा वेळ आम्हाला माफ कर–खूप दिवसानी भेटतोय, तू जेनीबरोबर आणि माझ्या आईशी तोपर्यंत गप्पा मार!' आणि दोघ उठून दिवाणखान्याच्या व्हरांडावजा कोपऱ्यात जाऊन बसले. मी उठून जनी आणि लुम्फीच्या आई शेजारी बसलो. इराणमध्ये नाव उच्चारण्याआगोदर " आगा-ए-"न म्हणता आणि माझ्या नावाचा बरोबर उच्चार करणारा लुम्फी पहिला पर्शियन !

जेनीन पिस्त्याचं ताट माझ्यापुढं केल. मी दोन तीन पिस्ते उचलले. लुम्फीची आई मिष्किल हसली. जणू तिला म्हणायचं होतं, तुम्ही मॅनर्स पाळणारे लोक महामूर्ख ! एव्हढे उत्तम पिस्ते असे एक दोन घ्यायचे नसतात! मूठ भरून उचलायचे असतात–नाही तर पिस्त्यांचा अपमान होतो! '

जेनीला थोड फार फार्सी येत होतं, पण ती अडखळत आणि ओठांची विचित्र हालचाल करत फार्सी बोलायची. जेनीच्या मदतीनं लुम्फीच्या आईन माझी सारी बित्तबातमी पाच–दहा मिनिटात मिळवली. ह्या वृद्ध आयाची एक स्पेशालिटी सर्व आशियात जाणवते. अचूक प्रश्न विचारून थोड्या वेळात त्या सर्व माहिती काढून घेऊ शकतात. ह्या वृद्ध माताची प्रश्न विचारायची पद्धत 'डायरेक्ट' असते. आडवळणानं माहिती काढण्याचा प्रयत्न करण्याइतका त्यांच्यापाशी वेळ नसतो. त्याचे सवाल सरळ असतात. मला चार मुली आहेत हे ऐकून लुम्फीची आई खूप झाली. अर्थात प्रयत्न कर–मुलगा होईल हा आशीर्वाद तिनं दिलाच आणि मग ' स्वयंपाकघरातील पाहिल पाहिजे ' अस पुटपुटत मला जेनीच्या हवाली करून मॉदरजॉन नाहीशी झाली.

## जेनीची कथा

जेनी अवघडलेली. मी लुम्फीच्या आईबरोबर खाजगी गप्पा करून ' मोकळा मोकळा ' झालेलो. काहीसं ओशाळवाणं हसत शांततेचा भंग करत जेनी म्हणाली, "माफ कर हं ! इराणी म्हाताऱ्या माणसाना खाजगी प्रश्न विचारायची वाईट सवय आहे. तुला खूप अवघडल्यासारखं झालं असणार !" मी जोरजोरात मान हलवत जेनीला म्हटलं, " छे: छे:– – त्यात अवघडण्यासारख काहीच नव्हतं. उलट मला फार बरं वाटलं. आजकाल इतकी आपुलकीनं चौकशी फक्त वृद्ध माणसच करतात...मला अगदी माझ्या आईबरोबर गप्पा मारल्यासारखं वाटल ! "

हात हवेत फेकत, खांदे उडवत जेनी उठली. माझ्यासमोर तिनं व्हिस्कीची बाटली, बर्फ आणि पाणी ठेवलं. स्वत.साठी एक ड्रिंक बनवत, सिगरेट पेटवून, नवऱ्याला ' फार्सी गप्पा पुरे ' असा इशारा करून धूर सोडीत ती स्वत.शीच बोलत असल्याप्रमाणे म्हणाली,"लुम्फी मला नेहमी हेच सागतोय; पण मला ते पटत नाही. प्रत्येकानं आपलं जीवन जगावं. दुसऱ्याच्या खाजगी चवकशा करू नयेत. लुम्फीबरोबर लग्न होऊन सहा वर्षं झाली. पाच वर्षं मी अमेरिकेतच राहिले. इथं येऊन मला जेमतेम वर्ष होतंय; पण इकडच्या ' कल्चर ' शी मला जमवून घेता येत नाही. आणि " दुसऱ्याच्या खाजगी गोष्टी विचारू नये " म्हणणारी जेनी नकळत स्वत.च्या खाजगी गोष्टी मला सांगू लागली.

जेनी अमेरिकेतील सिॲटल् ह्या गावची. सिॲटलला बोईंग विमानांचा मोठा कारखाना. तेथे सुपरसॉनिक बोइंग तयार करण्याचा अमेरिकेचा इरादा. अखेर तो बेत बदलला. इंग्रज आणि लोकानी एकत्र येऊन' कॅकॉर्ड ' बनिवण्याचा निर्णय घेतला. सिॲटलचा कारखाना बंद करण्यात आला. हजारो लोक बेकार झाले. सिॲटल् गावावर प्रेतकळा पसरली.

जेनीच्या बापाची सिॲटलमध्ये छोटीशी बेकरी. धंदा जेमतेम जेनीला तीन भाऊ आणि चार बहिणी. मोठ कुटुब. जेनी मधली. शिक्षण माध्यमिक शाळेपर्यंत. शॉर्ट हॅड–टायपिंगचा कोर्स करून जेनीनं बोस्टन इथं नोकरी पत्करली. तिथ लुम्फी काही कामानिमित्त आला असताना तिची आणि त्याची ओळख झाली. लुम्फी राजबिंडा, बुलंद आणि श्रीमंत ! त्याचा बोस्टनमध्ये एक फ्लॅट, न्यूयॉर्कमध्य एक फ्लॅट. दोघाचं लग्न झालं. चर्चमध्ये आणि इराणी पद्धतीनं देखाल. लग्नानंतर पहिल्या हिवाळ्यात जेनी इराणमध्ये आली. लुम्फीच्या हजारो नातेवाइकाच्या घरी रोज पार्टीला जाऊन अखेर आजारा पडली. लुम्फी तिला एखाद्या 'शो पीस' प्रमाणे सर्वत्र घऊन मिरवायचा. इराणी लोक खादाड, बाचाळ आणि भडक स्वभावाच. लुम्फीला अनेक देखण्या इराणी मैत्रिणी ! त्याचा लुम्फीभोवती सदेव गराडा. शारीरिक आणि मानसिक ताण असह्य होऊन इराणा संस्कृतीचा धसका घेऊन जेनी अमेरिकेत परतली. लुम्फीच्या न्यूयॉर्कमधील फ्लॅटमध्ये ती रहायची. लुम्फी वर्षाकाठी सहासात महिन अमेरिकत असायचा; पण सदा कामात ! व्यापारात, पैशाच्या उलाढालीत गढलेला. आता त्याच म्हणणं होतं की, अमेरिकेतील धंदा हळूहळू आवरता घेऊन तो फ्रान्स आणि इंडियाबरोबर व्यवहार वाढवणार–म्हणून गेल्या वर्षाभरापासून जेनी इराणमधील इस्फहान

ह्या गावी येऊन राहिली होती; पण इराणी जीवनपद्धती काही तिच्या पचनी पडत नव्हती.

जेनी खूप बोलत होती. मी ऐकत होतो. अखेर सर्फराझ आणि लुम्फीच्या जिव्हाळ्याच्या गप्पा संपल्या. माझ्या खांद्यावर थोपटत, माझ्या शेजारी बसत लुम्फी म्हणाला, 'जेनीचं काहीही ऐकू नको. तिला सुख बोचतंय. इथं काही कमी नाही; पण तिला आपल्या बापाच्या घरी जाऊन त्याच्या बेकरीमधील कणकेचे गोळे बनविण्याची मधूनच ऊर्मी येते आणि मग ती उदास चेहऱ्यानं बसून राहते !'

बोलता बोलता त्यानं जेनीच्या गालावरून हात फिरवत तिच्या हाताचं चुंबन घेतलं. जेनी फणकाऱ्यानं उठली आणि 'सासूबाईंना' मदत करण्यासाठी स्वयंपाकघरात गेली. स्वत:च्याच मांडीवर थापटी मारत मोठमोठ्यानं हसत लुम्फी म्हणाला, 'सर्फराझ मला सांगत होता की तू फिल्ममेकर आहेस. मग ह्या अॅग्रिकल्चरल मार्केटिंग वगैरे भिकार विषयात स्वत:चा वेळ कशाला वाया घालवतोस? तेहरानमध्ये मी मोठा फिल्म स्टुडियो घालणार आहे. तू युनोची नोकरी सोड ! मी तुला स्टुडियोचा मुख्य करतो. युनोच्या डब्बल पगार देतो !' माझा चेहरा बघून लुम्फीची बडबड मध्येच थांबली. प्रसन्न हसत 'ओके-ओके-माफ कर' म्हणत त्यानं स्वत:चा ग्लास व्हिस्कीनं भरला. सर्फराझनं एक लांबलचक सुस्कारा सोडला !

## हातमाग ते यंत्रमाग

आमचं जेवण नव्हे मेजवानी संपली आणि लुम्फीला मी प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. पस्तिशीचा लुम्फी एक यशस्वी कापड-कारखानदार आणि गिरणीमालक तर होताच त्याचबरोबर अतिशय कुशाग्र बुद्धीचा सामाजिक मनोवृत्तीचा अभ्यासक देखील होता. त्याचं वाचन प्रचंड होतं. आपल्या किताबखान्यातून दुर्मिळ पुस्तकं काढून तो मला अनेक गोष्टी समजावून सांगू लागला. इस्फहान हे शहर प्राचीन काळापासून हातमागावर विणलेल्या तलम रेशमी वस्त्राबद्दल प्रसिद्ध. आज आधुनिक इस्फहानमध्ये एकही हातमाग नव्हता—हातमागाची जागा यंत्रमागानं घेतली होती आणि हा बदल कसा घडला ते लुम्फी मला सांगत होता. मी माझा छोटा कॅसेट टेपरेकॉर्डर 'ऑन' केला. सूत कापसापासून बनतं आणि कापूस हे कृषिउत्पादन. कापूस उत्पन्न करणाऱ्या शेतकऱ्याला कापड बनविणाऱ्या कारखानदाराच्या तुलनेत किती 'नफा' पदरी पडत होता ह्याची काही उत्तरं मिळाली तर मला हवी होती. चाणाक्ष लुम्फीनं नेमका तोच विषय टाळला; पण इस्फाहानमधील हातमागाची जागा यंत्रमागानं कशी घेतली ह्याबद्दलचा त्यानं सांगितलेला इतिहास हा खरोखरीच अद्भुत होता.

रात्री हॉटेलवर परतल्यावर लुम्फी दारबंदोबरोबर झालेल्या चर्चेवर नोटस् काढत बसलो.

शहा अब्बासच्या काळात इराणनं आपल्या संस्कृतीचा परमोच्च बिंदू गाठला असं मानल जातं. एकदा परमोच्च बिंदू गाठला की तिथून पुढील पायरी म्हणजे घसरगुंडी हे ओघानच आलं. कालचक्राचा तसा नियमच आहे आणि इराणच्या बाबतीत तो लागू पडला. इराणच्या बाबतीत जे घडलं तेच इतर देशांच्या बाबतीत घडलं आहे आणि भविष्यात घडणार आहे. शिखर गाठलं की पुन्हा खाली उतरणं ही स्वाभाविक प्रवृत्ती आहे. सर्वोत्तम वास्तुशिल्प, सर्वोत्तम राज्यव्यवस्था, सर्वोत्तम कलाविकास असं सर्व काही सर्वोत्तम दर्जाचं झाल्यानंतर तेथून पुढं दर्जा घसरण्यापलीकडे संस्कृतीला करण्यासारखं काही उरतच नाही !

शहाअब्बासनंतर महमूद अफघानीनं इस्फहानचा पाडाव करून इराणचा धुव्वा उडवला त्याला कारण परमोच्च बिंदू गाठून घसरगुंडीला लागलेली इराणी संस्कृती. महमूद अफघानी हा केवळ निमित्त. जसा आपल्यावर सतरा वेळा हमला करणारा गझनीचा महमूद हा निमित्तमात्र—आपल्या संस्कृतीनं आर्यपूर्वकालात परमोच्च बिंदू गाठला असावा. कारण आर्य हिंदुकुश ओलांडून आले तेव्हा आम्ही घसरगुंडीवरच बसलेले होते.

१९७२ साली मी इराणमध्ये शेतकऱ्याच्या शेतमालाच्या विक्रीसंबंधी असलेल्या अडचणींचा अभ्यास करून त्यावर काही शैक्षणिक कार्यक्रमाची आखणी करणार होतो. त्याआधी वरील सर्व पार्श्वभूमी ध्यानात घेणं जरुरीचं होतं. अप्रत्यक्ष जमीनदारी, सरकारी मालकी, कसणाऱ्याची मालकी, कर्जपुरवठ्याच्या सोयी आणि गैरसोयी वगैरे अनेक प्रकार अजूनही अस्तित्वात होते. माझा हमसफर सर्फराझ आणि इतर इराणी विशेषज्ञ, शेतकी अधिकारी, समाजशास्त्रज्ञ ह्यांच्या मदतीनं माझा शोध चालू होता.

अठराव्या शतकातील इराणमधील काही महत्त्वाच्या घडामोडी विचारात घेणं देखील आवश्यक आहे. नेपोलियननं जग जिंकण्याची इच्छा प्रकट केली तेव्हा आशियाखंडात अफवा पसरली की हा महत्त्वाकांक्षी फ्रेंच योद्धा लवकरच हिंदवर स्वारी करणार आहे. हिंद काबीज करण्याअगोदर अर्थातच त्याची सेना इराण आणि अफघानिस्थान पादाक्रांत करणार आहे. साहजिकच पश्चिम आशियायी नागरिकांच्यात घबराट उडाली ! अवघ्या इंग्रजांनी ह्या घाबराटीचा फायदा उठविण्याचा एक कट रचला. हिंदुस्थान जवळजवळ गिळंकृत केलेल्या ह्या हरामी इंग्रजांनी इराण गिळण्याची योजना आखली.

१७९९ साली मुंबईहून इंग्रजांचं एक प्रतिनिधी मंडळ इराणचा राजा फतेअलीशहा ह्याच्या दरबारी दाखल झालं. ह्या मंडळाचं काम होतं फतेअलीशहाला नेपोलियनच्या आक्रमणाबद्दल भीती घालणं. मंडळानं आपली कामगिरी चोख बजावली. इ. स. १८०० च्या सुमारास कॅप्टन मालकम नावाच्या कावेबाज इंग्रजाच्या नेतृत्वाखाली दुसरं प्रातिनिधिक मंडळ पाठविण्यात आलं,

ह्या दरम्यान अफघानी लोकांनी इंग्रजांच्या एक तुकडीला खैबरखिंडीत चांगलंच पाणी पाजलं होत. अफघानिस्तानवर हुकुमत गाजवायला मिळत नसल्यामुळं हे चोर व्यापारी दुखावले होते. वतनप्रेमी अफघानी टोळीवाल्यांनी खैबरखिंडीत इंग्रजांची इज्जत धुळीला मिळवली होती. इंग्रज सूडाच्या भावनेनं पेटले होते! कॅप्टन मालकमनं प्राथमिक बोलणी झाल्यावर फतेअलीशहाबरोबर एक करार केला. कराराची पहिली अट होती, 'काबूलचा अमीर जोपर्यंत हिंदच्या सरहद्दीवर हल्ला करून इंग्रजांच्या ताब्यातील प्रदेश बळकावण्याचे प्रयत्न थांबवत नाही तोपर्यंत इराणनं अफघानिस्तानबरोबर कसलाही शांतताकरार करायचा नाही !' ही पहिली अट म्हणजे ब्रिटिश हरामखोरीचा उत्कृष्ट नमुना !

हूल उठली होती नेपोलियन इराणवर आक्रमण करणार अशी !

आणि कराराची पहिली अट काय होती? तर इराणनं अफघानिस्तानबरोबर दुश्मनी जाहीर करावी! म्हणजे ह्या हरामी इंग्रजाना संधी साधून अफघानिस्तानवर हल्ला करून काबूलमध्ये युनियन जॅक फडकावणं सोपं गेलं असतं! एकदा अफघानिस्तान ताब्यात आलं असतं की, मग इराण बळकावणं विशेष कठिण नव्हतं. नेपोलियनच्या इराण आणि हिंद आक्रमणाची अफवा इंग्रजांनीच उठविली असण्याची दाट शक्यता आहे.

## कावेबाज साम्राज्यवाद्यांच्या कचाट्यात

ह्या पाताळयंत्री लोकानी फसवेगिरी करून हिंदुस्थानवर ताबा मिळवला. त्यानंतर खैबरखिंड ओलांडून अफघानिस्तान, इराण हे देश पादाक्रांत करण्याची स्वप्नं त्यांना पडू लागली असल्यास नवल नाही. मुलुखगिरी करणाऱ्या ह्या अवर्णांना एक ऐतिहासिक सत्य कदाचित माहित नसावं – खैबरखिंड पार करून हिंदवर हल्ला करणं सोपं असलं तरी हिंदमधून खैबरखिंड पार करून 'पल्याड'च्या मुलखावर स्वारी करणं अत्यंत कठीण होतं. इंग्रजांनी हिंदवासियांना व्यापारी कौशल्य आणि कूटनीती वापरून गुलाम बनवलं; पण अफघानिस्तान हवा असल्यास युद्धाखेरीज पर्याय नव्हता. अफघानी लोक युद्धामध्ये इंग्रजांना भारी आणि म्हणूनच हरामी इंग्रजानी 'नेपोलियन येणार' अशी हूल उठवून इराणमध्ये घबराट पसरवली. त्याच्याशी करार करून अफघानिस्तानला खच्ची करण्याचा उपद्व्याप आरंभला. हा प्रयत्न यशस्वी झाला असता तर योग्य संधी मिळताच त्यांना इराण आणि मध्यपूर्वेतील इतर देश गिळणं शक्य होणार होतं.

इ. स. १८०० साली कॅप्टन मालकमबरोबर फतेअलीशहानं कराराची दुसरी अट देखील मान्य केली. ती अट अशी होती– 'इराणमधील सर्व फ्रेंच नागरिकांना, फ्रेंच कंपनीच्या नोकरदारांना हद्दपार करणं.' ह्या सुमारास हिंदमध्ये इंग्रजांची काय परिस्थिती होती ह्याचा बारकाईनं अभ्यास केला तर ह्या अटीमागचा उद्देश आणि त्यांच्या कुटिल कारस्थानाची पुरेपूर कल्पना येऊ शकेल.

कराराची तिसरी अट होती – 'नेपोलियनच्या सैन्यापासून किंवा इतर परकीय आक्रमणापासून इराणला धोका निर्माण झाल्यास इंग्रज सैन्यानं इराणला मदत करायची. त्यासाठी इराणी सैन्याला आधुनिक युद्धसामुग्रीचा पुरवठा करायचा. त्या बदल्यात इंग्लंडला इराणमध्ये व्यापारी सवलती द्यावयाच्या. इंग्लंडमध्ये तयार होणारा माल उदा. कापड, लोखंड, पोलाद वगैरे चीजवस्तूवरील आयातकर आणि जकात माफ करायची तसेच व्यापार सुरळीत चालावा म्हणून ईस्ट इंडिया अधिकाऱ्यांना इराणच्या आखाती बंदरावर नियंत्रण ठेवण्याची खास सवलत' – नेपोलियनच्या आक्रमणाच्या वार्तेनं धास्तावलेल्या फतेअलीशहानं ह्या सर्व अटी बिनतक्रार मान्य केल्या.

इराणी इतिहासकारांचं म्हणणं असं की, फतेअलीशहा हा एक धूर्त आणि राजकारणात तरबेज असा राजा होता. हा करार मान्य करण्यामागं त्याचा खास हेतू होता. व्यापारी सवलतींच्या बदल्यात त्याला इंग्रजाकडून अद्ययावत युद्धसामुग्री हवी होती. फतेअलीशहाला खरी भीती होती रशियन आक्रमणाची आणि त्या भीतीपोटी त्यानं इंग्रजांच्या शब्दावर विश्वास ठेवण्याची तयारी दर्शविली.

फतेअलीशहानं इंग्रजांबरोबर हा करार केला तेव्हा फ्रेंच मुत्सद्द्यांनी त्याला आपल्या बाजूस वळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. (फ्रेंच हे इंग्रजाइतकेच हरामी!) त्यांनी फतेअलीशहाला खात्री दिली की हिंदवर स्वारी करण्याचा नेपोलियनचा अजिबात विचार नाही. इराणला नेपोलियनपासून धोका नाही आणि रशियानं जर इराणवर चढाई केली तर फ्रेंच सैन्य इराणच्या मदतीस धावून येईल, वगैरे वगैरे.

बिचारा फतेअलीशहा दोन कावेबाज साम्राज्यवादी शक्तींच्या कात्रीमध्ये सापडला. निश्चित निर्णय काय घ्यावा ह्याबाबत त्याच्या मनाचा प्रचंड गोंधळ उडाला असणार! इ. स. अठराशेच्या सुरवातीपासून इराणच्या परिसरात फ्रेंच, इंग्रज आणि रशियन ह्यांनी अनेक कारवाया आरंभल्या हे लक्षात घेण्यासारखं आहे. ह्या त्रिकुटात नाक खुपसायला त्या वेळी अमेरिका नव्हती. कारण अमेरिका तेव्हा नुकतीच जन्माला आली होती. म्हणजे दरवडेखोर इंग्रज आणि इतर युरोपियन तेथील मूळच्या रेड इंडियन लोकांची अमानुष कत्तल करून 'अमेरिका' निर्माण करण्याच्या उद्योगात रंगले होते.

१८०६ च्या सुमारास फ्रेंच आणि रशियन ह्यांच्यातील युद्धाला तोंड फुटलं. काही रशियन तुकड्या इराणच्या दिशेनं वळल्या. इंग्रज लोक युद्धसामुग्री पाठवतील म्हणून फतेअलीशहा वाट पाहू लागला. शस्त्रास्त्रे आली नाहीतच; पण इंग्रज व्यापार मात्र जोरात सुरू झाला. वैतागून फतेअलीशहानं फ्रेंचांबरोबर १८०७ साली नवा करार केला. त्या कराराची पहिली अट – 'रशिया आणि इंग्रज ह्यांच्याविरुद्ध लढण्यासाठी इराणनं फ्रेंचाना सहाय्य करायचं.' (फ्रेंचांनी इराणला नव्हे!) हे सर्व करार अभ्यासले म्हणजे वाटतं......जे वाटतं ते लिहिता येण्यासारखं नाही – ह्या अवर्ण हरामखोरांच्या कपटी उचापतीबद्दल नुसतंच फुल्या–फुल्या–फुल्या × × × असं पानभर लिहावं लागेल आणि तरीदेखील जे म्हणायचं आहे ते पूर्णपणे सांगून होणार नाही.

फ्रेंचांनी करार केला; पण त्यांच्या दुर्दैवानं त्याला विशेष महत्त्व प्राप्त होऊ शकलं नाही. कारण नेपोलियननं तोपर्यंत रशियाबरोबर तह करून युद्ध आवरतं घेतलं होतं. इंग्रजानी ह्या संधीचा ताबडतोब फायदा उठवला. मुंबईहून कॅप्टन मालकम आणि लंडनहून सर हरफोर्ड जोन्स १८०९ साली इराणमध्ये दाखल झाले. स्वत:च्या व्यापारी सवलती आणखी वाढवून घेऊन 'परकीय आक्रमणाच्या वेळी इराणला सर्वतोपरी सहाय्य करायचं' आश्वासन देऊन, नवा करार करून हरामजादे परतले!

रशियानं १८१३ साली इराणवर हल्ला केला. इंग्रजानी काहीही मदत केली नाही. (आपण मदत करणार नाही अशी हमी त्यांनी रशियनांना गुप्त करारानं अगोदरच दिली असावी!) फतेअलीशहाला, दरबंत, बाकू, शिरवान, शाकी, काराबाघ वगैरे शहरे रशियाच्या हवाली करावी लागली. एवढंच नव्हे तर ज्या प्रदेशावर इराणचा ऐतिहासिक हक्क होता असे जॉर्जिया, दाघेस्तान, मिंग्रेलिया वगैरे प्रांतदेखील रशियाच्या स्वाधीन करावे लागले. ह्या लढाईनंतर कास्पियन समुद्रातील इराणी आरमारदेखील रशियानं बरखास्त केलं. त्यानंतर रशियानं इराणभोवतीची आपली पकड हळूहळू मजबूत करण्यास सुरुवात केली.

## तुर्कोमानचाई तह

रशियाकडून पराभूत झालेल्या फतेअलीशहाला आता इंग्रजावर विसंबून रहाण्याखेरीज दुसरा पर्यायच उरला नाही. १८१४ साली त्यानं इंग्रजांना व्यापारी सवलती आणखी वाढवून दिल्या आणि 'परकीय आक्रमणाच्या वेळी संपूर्ण मदतीचं' नवं आश्वासन पदरात पाडून घेतलं. १८२६ साली रशियानं इराणवर पुन्हा जोरदार हल्ला केला. त्यावेळी रशिया आणि इंग्लंडमध्ये काय गुप्त करार झाले असतील ते त्यांचे त्यांना माहीत. इंग्रज काही इराणच्या मदतीला धावून आले नाहीत हे मात्र सत्य.

रशियानं इराणला अगदी जेरीस आणलं तेव्हा इंग्रजांनी सर जॉन मॅकडोनल्ड नावाच्या मंत्रीमहाशयांना वाटाघाटी करण्यासाठी पाठवलं. लढाई रशिया-इराणची पण वाटाघाटीला सर जॉन हा इंग्रज माणूस! कज्जर घराण्याच्या म्हाताऱ्या फतेअलीशहाला सर जॉननं अतिशय लाजीरवाण्या अटी मान्य करायला लावून रशियाबरोबर तह करण्यास भाग पाडलं. समरप्रसंगी इराणला कसलीही मदत न करता, कारण इंग्रजांना रशियाबरोबर दुश्मनी परवडणारी नव्हती. वाटाघाटीत पुढाकार घेऊन, इराणचं इंग्रजानी जे दिवाळं काढलं, त्यालाच 'ब्रिटिश डिप्लोमसी' म्हणतात.

ह्या वाटाघाटीतून जो करार झाला त्यानुसार इंग्रजांना व्यापाराच्या अनिर्बंध सवलती हे तर झालच. त्याचबरोबर दक्षिण इराणचा अझरबैजान हा प्रदेश रशियाला अर्पण आणि रशियन नागरिकाना इराणमध्ये मनमानी सवलती.

१८२८ साली झालेला हा करार 'तुर्कोमानचाई तह' ह्या नावानं प्रसिद्ध आहे. यंत्रशास्त्रामध्ये प्राविण्य मिळवलेल्या राष्ट्रानी (इंग्लंड आणि रशिया) इराणसारख्या एका आशियायी देशाला पद्धतशीरपणे लुटण्याचे कारस्थान कसे रचले ह्याचा हा करार एक उत्कृष्ट नमुना आहे. (आधुनिक इराणला लुटण्यासाठी इग्रज, रशिया, युरोप, अमेरिका हे यांत्रिक दृष्ट्या प्रगत देश आजही ह्या 'तुर्कोमानचाई तहा' च्या धर्तीवर अटी घालून लुटण्याचा प्रयत्न करीत असल्याचे आपण पहातच आहोत.) काही 'पंडित' आणि विद्वान 'बळी तो कान पिळी' ह्या म्हणीचा दाखला देऊन वर आणखी इंग्रजाच्या कुशल राजनीतीचं कौतुक देखील करतील. इराणच्या कज्जर राजा फतेअलीशहाला दिवाळखोर, बुद्धीहीन, दरिद्री, कमकुवत मनाचा असं म्हणतील. म्हणोत. इंग्रजाच्या कुशल राजनीतीचं तोंडभरून कौतुक करणारे सर्व पंडित आणि विद्वान स्वतःचा देश विकण्याचे काम अतिशय तत्परतेनं पार पाडत असतात. त्याबद्दल इतिहासात भरपूर पुरावा सापडेल.

१८३० ते १८९६ ह्या काळात पाश्चिमात्य साम्राज्यवादी — म्हणजच आपले ग्रेट इंग्रज (आणि रशियन सुद्धा) ह्यानी इराणवर आपलं संपूर्ण वर्चस्व प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरु केले. संपूर्ण आशिया खंडात पाश्चिमात्य साम्राज्यवाद्यांचा हस्तक्षेप सुरु झाला. हिंद संपूर्णपणे इंग्रजाच्या मुठीत आला होता.

हिंदवर हुकुमत गाजविणाऱ्या इंग्रजांनी इ. स. १८०० पासूनचा 'अनुभव' ध्यानात घेऊन असा निष्कर्ष काढला की, 'आपला इंडिया' जर शाबूत रहायचा असेल, त्याच्या सीमेचं रक्षण करायचं असेल तर त्यासाठी इंग्लंडच्या राजमुकुटाचा इराणवर ताबा असणं अत्यंत आवश्यक आहे. असले अफलातून निष्कर्ष काढण्यात इंग्रज पटाईत.

ह्या दरम्यान फक्त एकदाच—१८६४ साली रशियानं अफघानिस्तान काबीज करण्याचा प्रयत्न केला तेव्हा इंग्रज रशियाच्या विरुद्ध युद्धास तयार झाले. प्रत्यक्षात लढाई झालीच नाही. अफघानिस्तानातचं स्वातंत्र्य अबाधित राहिलं. कावेबाज इंग्रजांनी धूर्त रशियनांबरोबर तडजोड केली आणि अफघानिस्तानचा नाद सोडून दोघानी एकत्र येऊन इराणची चोहोबाजूने नाकेबंदी केली. अफघानिस्तान प्रकरणावरून होऊ घातलेले इंग्रज-रशिया युद्ध हा देखील एक राजनैतिक बनाव असण्याची दाट शक्यता आहे. ह्या प्रकरणानंतर इंग्रजानी पर्शियन आखातामधील बंदर बुशेर ताब्यात घेतलं आणि इराणशी 'व्यापार' वाढविण्यासाठी (!) त्याना सागरीमार्ग खुला झाला. (भविष्यकाळात जर तिसरं महायुद्ध झालं तर इंग्रज अमेरिकेला आश्वासन देतील आणि रशियाशी गुप्त करार करून संपूर्ण आशिया आफ्रिका, इजिप्त आणि मध्यपूर्व-म्हणजे अरब राष्ट्रे आणि इस्त्राईल ह्यांची अॅटॉमिक होळी करण्यास हातभार लावतील, हे निःसंशय. ही होळी पेटेल तेव्हा आम्ही रूडयार्ड किप्लिंग किंवा अन्यकुणावर परिसंवाद घेण्यात रंगलेले नसलो म्हणजे मिळवली !)

## हातमाग बंद पडले

बंदर बुशेरवर ताबा मिळाल्यानंतर इंग्रजांनी इंग्लंडच्या कारखान्यात तयार होणाऱ्या मालाची इराणमध्ये मोठ्या प्रमाणावर आयात करण्यास सुरुवात केली. इंग्लंडच्या मालावर कर, ऑक्ट्रॉय किंवा प्रांतीय जकात माफ होती. इराणमध्ये तयार होणाऱ्या 'स्वदेशी' मालावर मात्र स्वतःच्याच देशात हा माल एका प्रातातून दुसऱ्या प्रांतात 'आयात निर्यात' करताना जबरदस्त जकात वसूल केली जायची. (आमच्या इथं देखील इंग्रजानी अशीच पद्धत घालून दिली होती, — इंग्रज गेले पण जकात नाकी तशीच आहेत.) परिणामाती इंग्लंडच्या 'इंडस्ट्री' मध्ये तयार झालेला माल इराणी 'कारागिरांनी' बनविलेल्या मालापेक्षा खूपच स्वस्त किंमतीत उपलब्ध व्हायचा. इराणी हातमागाच्या वस्त्रापेक्षा इंग्रजाच्या मॅंचेस्टर यंत्रमागावरील कापड स्वस्त दरात मिळायचे. या मांजरपाटाचा खप वाढला तसे हातमागावर दर्जेदार तलम वस्त्र विणणारे इराणी भूकेकंगाल बनून देशोधडीला लागले. मॅंचेस्टरमध्ये तयार होणाऱ्या कापडाला इराणी हातमागाच्या वस्त्राइतकाच कर लावला असता तर हे फालतू 'मांजरपाट' इराणी वस्त्राबरोबर कधीच मुकाबला करू शकले नसते.

इराणमधील 'स्वदेशी' व्यापार आणि उद्योगाचा पहाता पहाता संपूर्ण नाश झाला. इराणमध्ये 'तयार वस्तू' आयात होऊ लागल्या आणि इराणमधून फक्त 'कच्चा माल' निर्यात होऊ लागला. आपल्याकडे देखील ह्याहून वेगळं काही घडलं नाही. एकोणिसाव्या शतकाच्या सुमारास इस्फहान, काशान, याझ्द येथील रेशमी आणि सुती वस्त्र बनविणारे अठराहजार हातमागाचे कारखाने (एक कारखाना म्हणजे कमीतकमी शंभर हातमाग) इंग्रजाच्या मॅंचेस्टर क्लॉथ मुळे बंद पडले. इराणवर इंग्रजांनी प्रत्यक्ष राज्य केलं नाही पण स्वार्थी व्यापारी तंत्राचा वापर करून त्या देशाची धूळधाण

कशी उडविली ते अभ्यासण्यासारखं आहे, इंग्रजांच्या रक्तातच स्वार्थी आणि कपटी व्यापारी वृत्ती आहे, हयाची सदैव जाण ठेवणं आवश्यक. इराणी महाकवी फिरदोसी हयाच्या 'शहानामे' मधील एक गोष्ट आठवली ती जाताजाता सांगतो–

पर्शियाचा पुराणकालीन सम्राट कैकावूस हयाच्या मनावर एकदा 'अऱ्हीमन् 'नं (कुविचार आणि अंधःकार हयाची देवता) भुरळ घातली आणि मोझेनदरात प्रांताच्या (रशियालगतचा प्रदेश) राजाबरोबर युद्ध करण्यास त्याला प्रवृत्त केले. मोझेनदरानी राजाच्या तैनातीत एक सफेद कातडीचा ' दिव ' होता. ( दिव म्हणजे white demon – गोरा राक्षस). हया दिवानं आपल्या मंत्रसामर्थ्यानं सम्राट कैकावूस आणि त्याच्या सर्व सैनिकांना आंधळं केलं आणि कैद करून तुरुंगात डांबलं. कैकावूस राजाला आपला मूर्खपणा समजून चुकला. त्याने मनातल्या मनात रुस्तुमच्या नावानं धावा केला.

झाबोल इथं (अफघानिस्तान) मृगयेत रमलेल्या रुस्तुमला कैकावूस राजाची हाक ऐकू गेली. आपल्या आवडत्या, अत्यंत वेगवान आणि तेजःपुंज अशा महाकाय 'रक्श' नामक अश्वावर स्वार होऊन महाबली रुस्तुम तातडीनं मोझेनदरान इथं पोहचला.

वेशीवर भेटलेल्या एका वृद्ध योग्यानं रुस्तुमला सांगितलं की' सम्राट कैकावूस आणि त्याच्या सैनिकांचं अंधत्व दूर होऊन तुरुंगातून त्यांची सुटका करायची असेल तर प्रथम सफेद चामडीच्या राक्षसाला –दिवाला ठार करून त्याचं रक्त प्राशन करावं लागेल.

महापराक्रमी रुस्तुमनं त्या वृद्ध योग्याच्या सल्यानुसार गोरा राक्षस दिव याला युद्धाचं आव्हान दिलं. सात दिवस आणि सात रात्र ते झुंजले. अखेरीस रुस्तुमनं ' अहूर मझदा 'ची (सुविचार आणि प्रकाशाची देवता) प्रार्थना केली आणि कमरेला लटकणारी हिंदी तलवार उपसून एका घावात दिवचा शिरच्छेद केला. त्याच्या कंठातून उसळणारं गरमगरम रक्त रुस्तुम घटाघटा प्याला आणि पर्शियन सम्राट कैकावूसचे डोळे उघडले–गोऱ्या राक्षसाच्या मंत्रातून तो मुक्त झाला.

आज प्रत्येक इराणी माणसाला रुस्तुमची तीव्र आठवण येत असेल.

[ क्रमशः ]


# वृध्दपणीचा काळ सुखाचा

''कर्तबगार मुलें, विनम्र सुना, सभोवताली बागडणारी हंसरी नातवंडे, त्यांचे बोबडे बोल, स्वतःचं टूमदार घर, आयुष्यभर साथ देणारी प्रेमळ पत्नी. टुणटुणीत तब्येत... बस! तुम्ही म्हणाल आणखी काय हवे म्हातारपणी ?

पण एवढ्यावर नाही भागत. म्हातारपणी लागते ती पैशाची निश्चिंतता. आपला कोणावर भार नाही—आपण कोणावर अवलंबून नाही असे स्वाभिमानी जीवन— असा मोकळेपणा येतो तो स्वतःच्या पैशाने ...तो असेल तर तुमच्या शब्दाला मान आहे...जीवनाला अर्थ आहे...

पैशाचे बाबतीत मात्र आम्ही म्हातारा म्हातारी स्वयंपूर्ण आहोत...सुखी आहोत. सांगली बँकेत गुंतविलेल्या ''मासिक उत्पन्न ठेव'' योजनेमुळें आम्हाला महिन्याचे महिन्याला घरबसल्या व्याज मिळते...पेन्शनच म्हणा ना...शिवाय निवृत्तीच्या वेळी ऑफिसातून मिळालेली रक्कम सांगली बँकेच्या ''डायमंड ज्युबिली सर्टिफिकेटस्मध्यें गुंतविल्यानें त्यांचे भरपूर व्याज मिळते ते वेगळेच. नोकरीत असतांना फिक्सड् डिपॉझिटमध्ये पैसे गुंतविण्याची संवय ठेवल्यानें त्याचेही येते व्याज...त्यामुळे झाले काय व्याज येते चहूबाजूनीं... मूळ भांडवल सुरक्षित... नुसत्या व्याजावर संसार चाललाय मजेत...पैशाची चिंता नाही...कसे होईल काळजी नाही... सांगली बँकेच्या योजनांचा हा फायदा बरे! म्हणूनच ह्या वयांतसुध्दां मला वाटते...जीवनात मौज आहे... म्हातारपणात सुध्दा सुख आहे''.



चेअरमन : एम. आर. रणदिवे

आपल्या उत्कर्षातील साथीदार

दि सांगली बँक लि.

रजि. ऑफीस-राजवाडा चौक, सांगली

Parkerson 80100

## पुस्तके

**पुण्याच्या विश्वकर्मा साहित्यालय या प्रकाशनसंस्थेतर्फे डॉ. वसंत पटवर्धन यांनी चाणक्याच्या जीवनावर लिहिलेली 'आर्य' ही कादंबरी येत्या २१ सप्टेंबरला प्रसिद्ध होत आहे. ही कादंबरी लिहिण्यामागील लेखकाचे**



# मनोगत

विशाखदत्ताचं 'मुद्राराक्षस' नाटक व हरिभाऊ आपटे यांची 'चंद्रगुप्त' कादंबरी यातील पार्श्वभूमीवर गडद रंगात चितारलेल्या चाणक्याच्या व्यक्तिरेखेनं माझं मन ओढावलं आणि त्यातून कौटिलीय अर्थशास्त्र या त्याच्या ग्रंथाच्या वाचनाची प्रेरणा झाली.

आपण सध्या ज्याला अर्थशास्त्र म्हणतो तसं ते नाही. इतकेच नव्हे तर कौटिल्यानं ज्या तऱ्हेने जीवनातल्या विविध अंगांवर आपली मतं प्रदर्शित केली आहेत ती विचारात घेता ही ऐतिहासिक व्यक्ती – मॅकोव्हिली वगैरे त्याच्याशी तुलना केल्या जाणाऱ्या मुत्सद्द्यांपेक्षा – किती तरी पटीनं श्रेष्ठ आहे, हे ते 'अर्थशास्त्र' वाचताना लक्षात आलं.

या व्यक्तीचा आणखी शोध घ्यावा म्हणून केलेल्या वाचनात मेगॅस्थिनिसनं केलेल्या भारतवर्णनाची भर पडली आणि शोध लावण्याऐवजी नवीन प्रश्नच मनात निर्माण व्हायला लागले. इतिहासात कौटिल्याबद्दल फारसा उल्लेखही नाही. ज्या दंतकथा आहेत त्यावरून ती व्यक्तिरेखा स्पष्ट होत नाही आणि प्रत्यक्षात त्याचं 'अर्थशास्त्र' मात्र उपलब्ध आहे. तेव्हा या सर्व प्रश्नांचा सुसंगत विचार करून काही तर्काधारित मांडणी करता येईल का, असल्यास तिचा घाट कुठला असावा, केवळ अर्थशास्त्रातल्या विविध अंगांवर इतरांनी संकलन केलं, तुलना केल्या, तशाच प्रकारे ती मांडणी करायची का, हा आणखी एक प्रश्न निर्माण झाला.

विशाखदत्त हा चंद्रगुप्ताच्या समकालीन किंवा नंतरचा नाटककार. त्यामुळं त्यानं काही गोष्टी गृहीत धरलेल्या असाव्यात; पण त्याच्याबद्दल इतरत्र अधिक लिहिलेलं मिळत नाही. एका राज्यक्रांतीवर हे नाटक लिहिताना त्याच वेळी जगाच्या इतिहासात नोंद होणाऱ्या अलेक्झांडरच्या आक्रमणाबद्दल फार उल्लेख नाही हे खटकणारं होतं. राक्षसावर आधारलेल्या या नाटकातल्या राक्षसाबद्दल इतरत्र उल्लेख नाहीत आणि नाटकातही त्यानं चंद्रगुप्ताच्या बाजूला येऊन अमात्य का व्हावं याचं तर्कसंगत उत्तर नाही. नाटक सुरू होतं तेच चंद्रगुप्त सिंहासनाधिष्ठित झाल्यानंतर!

चंद्रगुप्तानं राक्षसाला अमात्य म्हणून का नेमलं? चाणक्य हा क्रांतीचा सूत्रधार असूनही पुढं मगधात का राहाणार नाही? तसंच चंद्रगुप्ताचं कर्तृत्व किती, याबद्दल 'मुद्राराक्षस' मुग्ध आहे. त्यातली विषकन्या, पर्वतेश्वर, दारुवर्मा, वैरोचक ही सर्व माणसं अस्पष्ट रंगवलेली आहेत. चंद्रगुप्त अन् चाणक्य यांचं एकच भांडण दाखवताना त्यामागे वैचारिक द्वंद्व दिसत नाही; पण या बाबी किरकोळ आहेत. चंद्रगुप्त - चाणक्य - राक्षस हा त्रिकोण समभुज त्रिकोण वाटत नाही. राजनीतीवर आधारित अशा त्यांच्या कृती दिसत नाहीत.

कौटिल्याची एक अनुपम कृती उपलब्ध असूनही ते लेखन करण्यासाठी त्याला अनुभव कुठे मिळाला याचा खुलासा माझ्या आढळात आला नाही. अगदी कल्पनेचा विलास म्हणून देखील! अर्थशास्त्रावरील सूत्र आणि भाष्य सांगणारा ग्रंथ चंद्रगुप्तासाठी लिहिला हे जरी सर्वमान्य असलं तरी त्याने प्रथम हा ग्रंथ लिहिला आणि चंद्रगुप्ताने त्याचा पाठ्यपुस्तक म्हणून उपयोग केला असं असणं शक्य नव्हतं. त्याचबरोबर कौटिल्य-अर्थशास्त्रात वेगवेगळ्या ३४ अध्यक्षांची जी कर्तव्ये सांगितली आहेत ती केवळ आचार्यांनी मनाने लिहिली आहेत असंही पटत नव्हते. ही मांडणी इतकी सखोल आणि पद्धतशीर आहे की त्यामागे कुठेतरी अनुभवाची पूर्वपीठिका असल्याखेरीज अशी कृती हातातून लिहिली जाणार नाही असेही वाटत होते. कौटिल्याने आपला ग्रंथ लिहिला आणि चंद्रगुप्ताच्या करवी साम्राज्य स्थापन केले. त्याचे कार्यकारण केवळ नंदराजाकडून झालेला अपमान आणि म्हणून चंद्रगुप्ताला हाताशी धरून साम्राज्याची उभारणी एवढीच एक पार्श्वभूमी – हे खरं पाहिलं तर एखाद्या लहान मुलालाही पटू नये!

कौटिल्याचा इतिहास कुठंच लिहिलेला नाही. त्याचे पूर्वचरित्रही उपलब्ध नाही. ग्रीकांच्या इतिहासातही त्याचा जवळजवळ उल्लेख नाही. बौद्ध आणि जैन ग्रंथांतून आणि इतर भारतीय वाङ्मयातून त्याचा उल्लेख आढळतो; परंतु ज्या माणसाच्या हातून जगाला

ललामभूत व्हावा असा ग्रंथ निर्माण झाला त्या श्रेष्ठ व्यक्तीबद्दल केवळ दंतकथावर विसंबायला लागतं खरं! नंदराजाकडे आल्यानंतर केवळ आसनश्रेणीवरून त्याचा अपमान झाला आणि म्हणून त्याने आपली शेंडी सोडून नंदराजाचा विनाश करीन अशी प्रतिज्ञा केली ही एकच दंतकथा, त्या दंतकथातही महत्त्वाची! एक सामान्य ब्राह्मण एका राज्यसभेत येऊन अशी प्रतिज्ञा करतो आणि त्याला कोणीही आवरत नाही हे पटण्यासारखे नाही. विशेष म्हणजे—पूर्व दिशेला एक मोठे राज्य आहे आणि तेथील राजांच्या आधिपत्याखाली एक चतुरंग सेना असून ती बलाढ्य आहे, असे पौरवाने अलेक्झांडरला सांगितले होते आणि पौरवाशी झालेल्या निकराच्या झुंजीनंतर, प्राच्य देशातील या मगध राजाबरोबर झुंजावयास नको अशा कल्पनेनेच अलेक्झांडर कदाचित परत फिरला असेल हा इतिहास असता, चाणक्याने केवळ प्रतिज्ञा केली आणि सैन्य, संपत्ती, साधनाविना नंदराज्य उलथविलं हे अशक्यप्राय वाटतं. मनात अनेकदा प्रश्न येत होता, कौटिल्यानं हे सर्व कशासाठी केलं? त्याचे अर्थशास्त्रात जे संदर्भ दिसतात त्यावरून शस्त्रं आणि शास्त्रांच्या उद्धारासाठी हे केलं असावं असं दिसतं. त्याचबरोबर आर्यधर्म त्याने एका व्यवस्थित पद्धतीनं अभ्यासला होता आणि त्या धर्माची शिकवण सांगण्यासाठी त्यानं हा खटाटोप केला असावा, हेही तर्कानं मांडता येतं. भगवान बुद्ध आणि महावीर जैन यांनी देशात लोकयात्रेला एक वेगळे वळण लावले आणि अध्यात्मालाच महत्त्व दिले. त्यामुळे लोक कर्तव्य विसरून अहिंसेचा उलटा अर्थ घेऊ लागले होते. अपरिग्रहाला तसा खरा अर्थ उरला नव्हता, शस्त्र आणि शास्त्र याची कुचेष्टा व्हावी अशी परिस्थिती निर्माण झाली होती. इहवादाची कुचेष्टा सुरू झाली होती. लोक आपले दैनंदिन जीवन जगण्याऐवजी धर्माच्या नावाखाली वैराग्याच्या नादाला लागल्यामुळे धड वैराग्यही हातात पडत नव्हते. वैराग्याच्या नावाखाली शिस्त आणि नियंत्रण सुटल्यामुळे अनाचार सुरू झाला होता. राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण या गोष्टी दूर व्हावयास लागल्या आणि अलेक्झांडरसारखा परकीय येथील संपत्तीच्या आणि वैभवाच्या आशेने आला असता त्याला कुणीच प्रखर प्रतिकार करेनासा झाला. पराक्रमास किंमत उरली नाही आणि अहिंसेचा असाच चुकीचा अर्थ लावला गेला तर या देशाचे स्वातंत्र्य धोक्यात येईल या भावनेनेच कौटिल्य झपाटला गेला. बुद्ध आणि जैन यांची मूळ शिकवण जरी योग्य असली तरी तिचा तपशील आणि त्याबाबतचे आचार हे चुकीचे झाल्यामुळे ते सर्व बदलेले पाहिजेत, तरच लोकयात्रेला लागलेले हे चुकीचे वळण सुधारता येईल या भूमिकेतून नवीन राष्ट्रनिर्मितीसाठी त्याने एक प्रपंच घडविला असावा. त्याचे आयुष्य कशा पद्धतीने गेले असेल, नंद-साम्राज्यविनाश हा प्रतिज्ञापूर्तीचा भाग न राहता ते ध्येय कसं झालं असेल, परकीय सत्तेचे पाऊल इथं रोवलं जाऊ नये अशा दुर्दम्य महत्त्वाकांक्षेनं तो पेटून कसा उठला असेल याबाबतचा विचार करता हे सारे ऐतिहासिक संदर्भ एखादं जिग-झॉ कोडं (Jig Zaw Puzzle) सोडवल्यासारखे कादंबरीस्वरूपात जुळवता आले तर ते इष्ट ठरेल असं वाटून ह्या विषयात पडण्याचा मी निश्चय केला.

चाणक्य तक्षशिलेचा होता का पाटलीपुत्राचा होता; तो कोठून कुठे, कसा व का गेला; राक्षसाची आणि त्याची कशी गाठ पडली असेल; त्याचं आणि चंद्रगुप्ताचं वय किती असेल; त्याची आणि चंद्रगुप्ताची भेट कधी आणि कशी झाली असेल; चंद्रगुप्त अलेक्झांडरला कसा भेटला असेल; तो मगधात का व कधी यावा; चंद्रगुप्त आणि कौटिल्य याचे संबंध कसे घनिष्ठ होत गेले असतील; हा सर्व इतिहासाला आणि मुद्राराक्षसाच्या वाचकानाही अज्ञात असणारा भाग आहे. एका गुराख्याच्या किंवा एका दासीच्या पोटी जन्मलेला पुत्र असे चंद्रगुप्ताचे विचित्र चित्र काही वेळा रंगवलेले दिसते, ते खास चुकीचे असले पाहीजे असं अनेक विद्वानानी आता मान्य केलेलं आहे. कारण एका प्रचंड राज्य-निर्मितीसाठी ज्या योजकतेनं ही सारी माणसं एकत्र आली असं सांगितलं जातं ती केवळ दंतकथाच नसावी असं मानण्याइतक त्याचे हातून कार्य झालेले आहे. चंद्रगुप्त गुराख्याचा मुलगा असेल आणि कौटिल्यानं त्याला वाढविले असेल हे जरी खरे मानले तरीसुद्धा घनानंदाचे प्रबळ आणि प्रचंड राज्य उलथविण्यासाठी किती तरी मोठी यंत्रणा उभी करावी लागली असेल! अशी यंत्रणा उभी राहात असता मगध सम्राट डोळे मिटून बसला असेल हे अशक्य आहे. मुद्राराक्षसातील राक्षसाची – राज्य कोसळेपर्यंत खरोखर काय भूमिका असेल हाही एक महत्त्वाचा प्रश्न अद्यापही उनुत्तरित आहे त्याच्या अंगठीबद्दल आणि त्याच्या इतर वागणुकीबद्दल विशाखदत्ताने मुद्राराक्षस नाटकात जे लिहिले आहे त्यातील सर्व दुवे तर्कसंगत लावता येत नाहीत. त्यामुळे मुरादेवी, चद्रगुप्त, चाणक्य, धनानंद यांचे संबंध जुळवत असता त्याची कुठे तरी अलेक्झांडरच्या स्वारीशी पार्श्वभूमी जुळेल का, हा एक महत्त्वाचा प्रश्न माझ्या मनात सतत येत होता. ऐतिहासिक घटना कशा स्वरूपात घडल्या असतील, त्या जर कादंबरीच्या स्वरूपात सांगितल्या तर चाणक्याचे महान कार्य सर्वसाधारणपणे कौटिलीय अर्थशास्त्र न वाचलेल्या लोकांसमोरही वेगळ्या पद्धतीने ठेवता येईल, हाही मनात एक हेतू आहे. त्यामुळं कौटिलीय अर्थशास्त्रात किती साग्रोपांग विचार केला आहे हे मोठ्या वाचकवृंदासमोर जाऊ शकेल, असे मला वाटते.

मेगॅस्थिनिसची बखर हीही बुचकळ्यात टाकणारी आहे. मेगॅस्थिनीसच्या बखरीत पाटलीपुत्राचं वर्णन असलं तरी चाणक्याचा संदर्भ येत नाही असं कसं शक्य आहे? मेगॅस्थिनिसच्या बखरीत इतर वर्णने अतिशयोक्तीची आहेत. ही वर्णने वाचताना नेहमीच मनात यावयाचे की, मेगॅस्थिनिस खरोखर जर राजदूत म्हणून चंद्रगुप्ताच्या दरबारी पाटलीपुत्रात राहिला असेल तर अशी चुकीची वर्णने करण्याचं त्याला कारण काय? आज आपल्याकडील राजदूतही वेगवेगळ्या देशात जातात. तिथली वर्णने त्यांनी करायची ठरवलं तर ती इतकी चुकीची असणार नाहीत. कदाचित असंही असेल की मेगॅस्थिनिसने ही वर्णने चंद्रगुप्ताच्या राजदरबारात राजदूत म्हणून आल्यानंतर लिहिली व आर्यावर्तातील लोकांच्या बरोबर त्याची जर आधी गाठ पडली असेल तर त्याच्याकडून मिळालेल्या माहितीवर ती आधारित असावीत! कदाचित असेही शक्य आहे की तो स्वारीच्या प्रसंगी अॅलेक्झांडरबरोबर आर्यावर्तात आला असेल आणि ही तेव्हाची त्याची वर्णनं असतील! कौटिल्यानं अर्थशास्त्र लिहिल्यानंतर शिष्यानं ते संपूर्णपणे पुढं अनुसरून आपला कारभार काही दिवस

चालवला असेल आणि पुढे काही ग्रंथांतून चाणक्याच्या सूत्राचा संदर्भ दिला गेला असेल; पण काळाच्या ओघात ती अर्थनीती पुढे लुप्त झाली त्याचे कारण काय असावे हे कळायला मार्ग नाही. कदाचित असे असेल की, चाणक्याने आपल्या अर्थशास्त्रात लिहिलेली कर्तव्ये, नियम, बंधने, कठोर शिस्त समाजाला रुचली नसेल. राजकीय संदर्भात सामाजिक जीवन आणि सामाजिक संदर्भात राजकीय जीवन हे नेहमीच महत्त्वाचे ठरते. त्या दृष्टीने या घटनेकडे बघता येईल का ? राष्ट्रात शिस्त जरी हवी असली तरी सर्व स्वातंत्र्याचा संकोच करणारी आणि चाकोरोबद्ध जीवन जगावयास लावणारी शिस्त समाजाला आवडत नाही, हे गेल्या शतकात विविध राष्ट्रांतून दृष्टोत्पत्तीस आलेलं आहे. संपूर्णपणे राष्ट्र जर बिनशिस्तीचं राहिलं तर अनवस्था प्रसंग निर्माण होतात हाही इतिहास जगात अनेकदा अनुभवास आलेला आहे. त्यामुळे विशाखदत्तानं रंगवलेलं चंद्रगुप्ताचं आणि चाणक्याचं भांडण कदाचित तेवढ्याच पुरतं नसून अशा अनेक प्रसंगी गुरु-शिष्यात अंतर निर्माण झालं असेल आणि नंतर चाणक्यानं चंद्रगुप्तापासून दूर जाऊन आपले अनुभव ग्रथित करण्याच्या भूमिकेतून अर्थशास्त्र लिहिलं असेल हे सयुक्तिक वाटतं. काहीही असलं तरी चंद्रगुप्त आणि चाणक्य यांची ही पार्श्वभूमी जर वेगळ्या माध्यमातून सांगता आली आणि विशेषत: कौटिलीय अर्थशास्त्रातील वेगवेगळी सूत्रे प्रसंगानुरूप गुंफता आली तर क्लिष्ट वाटणारे कौटिलीय अर्थशास्त्र, वाचकाला कादंबरी वाचत असताना बऱ्याच प्रमाणात सहजसुलभ झाल्याचे समाधान मिळेल, या हेतूने हा प्रपंच केलेला आहे अशा पद्धतीची या पार्श्वभूमीवरील कादंबरी मराठीत अजून लिहिली गेलेली नाही.

विशाखदत्ताच्या नाटकाचा अनुवाद किंवा कौटिलीय अर्थशास्त्रावर आधारित असलेले ग्रंथ जरी विचारात घेतले तरी ते कौटिलीय अर्थशास्त्रातील सूत्रावर आधारित आणि इतिहासाला योग्य ते संदर्भ तर्कदृष्ट्या सुसंगत ठरतील अशी मांडणी करून जुळवले गेलेले नाहीत. या कादंबरीच्या निमित्ताने ते केल्याचा माझा नम्र दावा आहे. वाचकाला तो कितपत पटेल हे त्यानंच ठरवायचं आहे. इतिहास आणि त्यावर आधारित ललित साहित्य यात सत्य किती असावे, साहित्य किती असावे, कल्पकता किती असावी हे प्रत्येकाने ठरवायचं आहे. मी स्वत: इतिहाससंशोधन करणारा नाही किंवा संपूर्णपणे ललितसाहित्य लिहिणारा नाही; परंतु कौटिलीय अर्थशास्त्राचा विचार करताना अशा अनेक व्यक्तींना योग्य तऱ्हेने कल्पनेने दुवे जुळवून न्याय दिला पाहिजे असे मात्र मला सतत वाटते. त्यामुळे तारिणी आणि अपूर्वा यासारखी काल्पनिक पात्रे मी घातली आहेत. त्याबाबत प्रत्येकाची मते वेगळी असणे शक्य आहे. चंद्रगुप्त, चाणक्य, मेगॅस्थिनिस, पौरव आणि ॲलेक्झांडर ही इतिहासातील खरीखुरी पात्रे आहेत. राक्षस हे कदाचित खरे पात्र असावे असं विशाखदत्ताच्या इतके दिवस टिकलेल्या नाटकावरून अनुमान काढता येईल. या तिन्ही प्रकारच्या व्यक्ती एकत्र आणून आणि इतिहासातील व्यक्तिविशेष लक्षात ठेवून या कादंबरीची आखणी केली आहे. कौटिलीय अर्थशास्त्राला जर काल्पनिक घटनांची बैठक देता आली तर त्यातल्या सूत्राचा अर्थ सांगता येईल अशी माझी भूमिका आहे.

जाताजाता, कादंबरीत काही दंतकथांचा सहजपणे उल्लेख आहे; परंतु त्या दंतकथा वाटू नयेत अशाच पद्धतीने वापरल्या आहेत. इतिहासाची सर्वसामान्य बंधने मानत असताना या विषयावर फारसा इतिहास लिहिला गेलेला नाही ही एक मोठी अडचण जाणवली. वर्णने करीत असताना शक्य तो त्या वेळचे वातावरण उभे करण्याचा प्रयत्न केला असला तरी ती पात्रे मराठीत बोलत नव्हती, हे उघड असल्यामुळे त्या वेळेस कशी भाषा वापरली जात असेल अशा पद्धतीनेच ती वापरण्याचे स्वातंत्र्य अर्थातच माझ्याकडून घेतलं गेलेलं आहे. कादंबरी ही शक्य तितकी इतिहासाला धरून असावी हे जरी खरे असले तरीसुद्धा चाणक्याबद्दल फारसे लिहिले गेलेले नाही. त्यामुळे अर्थशास्त्र जर योग्य अर्थाने निरनिराळ्या अनुभवातून घडले असेल तर चाणक्याच्या पदरी अनुभव कसा आला असेल याचे चित्रण करण्याचा हा प्रयत्न केलेला आहे. अर्थशास्त्रातील अनेक सूत्राची संगती, तो ग्रंथ केवळ राजकारण, युद्ध, शत्रू, मित्र अन् तह याबद्दल विवेचन करणारा नसून त्यात माणसाची काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपूवर आधारित असलेली जीवनपद्धती डोळ्यासमोर ठेवलेली आहे, हे मला जास्त आवर्जून सांगावसं वाटलं. कुणाला श्रेष्ठ करण्याचा किंवा कुणाला खाली ओढण्याचा, कुणाला कसली तत्त्वज्ञानं चिकटवण्याचा त्यात प्रयत्न नाही. आचार्य विष्णुगुप्तांचं व्यक्तिमत्त्व किती थोर आहे आणि त्या व्यक्तिमत्त्वातून एक किती प्रचंड ग्रंथ निर्माण झाला आहे याची कल्पना येण्यासाठी हा प्रयत्न केला आहे. त्या जाणिवेतून गेली अनेक वर्षे वाचन आणि मनन करीत असता जे सुचले ते इथं लिहिलं आहे. काही मूलभूत प्रश्न मी आधीच उपस्थित केलेले आहेत आणि त्यांची घटनांच्या द्वारे उत्तरे देण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या गौरवशाली इतिहासाबद्दल जर अशा पद्धतीने लिहिले गेले तर ते जास्त रोचक ठरेल असे वाटते. वाचकही माझ्या भूमिकेतूनच कादंबरीकडे बघतील अशी नम्र अपेक्षा आहे. □

वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : १० रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

फिनिक्स निवड

# Anatomy of An Illness

As Perceived by the Patient :
Reflections on Healing and Regeneration by Norman Cousins.

आपण किंवा आपले आप्तेष्ट केव्हा तरी आजारी पडलाच असाल. आजारात ही टेस्ट घे, तो एक्सरे काढ वगैरे अनेक चाचण्या घेऊन व डॉक्टरच्या वेटिंग रूममध्ये बसून तुमचा किंवा आप्तेष्टांचा आजार वाढलाही असेल. वकिलाच्या कचाटयातून एखादे वेळेस बरेच लोक सुटू शकतात; पण ' क्लोरोफॉर्म ' चा अनुभव ज्याला आला नसेल तो पुरुषोत्तम वेगळाच !

आपल्याला कदचित् असाही अनुभव आला असेल की जेथे ४००–६०० रु. च्या चाचण्या व अनेक वेळा कन्सल्टेशनफी देऊन गुण येत नाही तेथे ४–५ रु. चे होमिओपाथिक किंवा आयुर्वेदिक औषध काम करून जाते.

' सामान्य ' माणूस आयुष्यभर राबतो. (सामान्य माणसाची व्याख्या आता बदलायला हवी. ' सामान्य ' म्हणजे जो कुणाला शेंडी लावत नाही, कुणाला त्रास देत नाही, अफरातफर करीत नाही. ' सामान्य ' म्हणजे स्वत:चा व्यवसाय चोखपणे करणारा व अंत:करण असलेला.) आपण केव्हा तरी आजारी पडू व त्यासाठी पैसे लागतील या हेतूने तो बचत करतो. ' सामान्य ' माणसाला ' डिग्निफाईड ' जगणं अशक्य झालं आहे. आता आपल्याला ' डिग्निफाइड ' मृत्यू तरी येईल या आशेने त्याने बचत केलेली असते. पण सहसा त्याला डिग्निफाईड मृत्यूही येत नाही. त्याची जी थोडीफार बचत असते तिची चटणी होते व म्हातारपणी अँन्टिबायोटिक्सच्या माऱ्याने तो धड जगतही नाही व धड मरतही नाही. ' डिग्निफाईड ' मृत्यू यावा यासाठी काही तरी व्यवस्था हवी. मी तर असे म्हणेन की डेथ बेडवर असणाऱ्यांनी औषधे, ट्रिटमेंट घेणं बंदच करावं. कारण पुष्कळ वेळा डॉक्टर्स पेशंटना ' अनडिग्निफाईड ' मृत्यूच बहाल करतात !

या पुस्तकाच्या लेखकाचे या विषयावरचे हे एक अप्रतिम पुस्तक आहे स्वत.ची स्वतंत्र बुद्धी चालवून तो हॉस्पिटल्स व डॉक्टर्स यांच्या कचाटयातून कसा सुटला त्याची ही एक मनोरंजक व उद्बोधक गाथा आहे. याच नॉर्मन कझिन्सचा, त्यांच्या आजाराविषयीचा उल्लेख मी २७ ऑक्टोबर १९७७ ' माणूस ' मध्ये Powers of mind या पुस्तकाचा परिचय करून देताना केला होता. श्री. नॉर्मन कझीन्स हे ' सॅटरडे रिव्ह्यू ' या मासिकाचे संपादक आहेत किंवा होते. तणावनिर्मित जीवनामुळे त्याना Collagen चा रोग जडला. Collagen रोग म्हणजे शरीरातील Connetive tissues चा रोग. साधेदुखी वगैरे. हा त्यांचा रोग फार जुना झाला होता. हॉस्पिटलमध्ये अनेक वेळा राहून काहीही सुधारणा झाली नाही. उलट हॉस्पिटलमधील नियमित दैनंदिन कार्यक्रमामुळे त्यांना पुरेसा आराम मिळेनासा झाला. अगदी पहाटे भाडया-कुंडयांची आदळ आपट, थोडीशी कुठे झोप लागली की औषध घेऊन नर्स आलीच आहे ! अनेक गोष्टींचा सारासार विचार करून त्यांनी ठरवले की, हॉस्पिटल हे आजारी माणसासाठी नाही. त्यांची अवस्था एकदम सीरियस असताना ते घरी गेले.

अर्थात् घरी जाण्याच्या आधी त्यांनी एक बेत आखला होता. श्री. कझिन्सनी डॉ. लाईनस पॉलिंगचे व्हिटॅमिन सी वरचे एक पुस्तक वाचले होते. या डॉ. लाइनस पॉलिंगच्या ' सी ' बद्दल सुद्धा मी ' माणूस 'मध्ये आधी लिहिले आहेच. कोलोजन रोगाचे काय किंवा संधीवाताचे, Arthritis चे काय, त्यांच्या कारणमीमांसेबद्दल बरेच दृष्टिकोन आहेत. काहींच्या मते हे रोग अॅलर्जीने होतात, तर काही म्हणतात की ते सूक्ष्म रोगजीवाणूने होतात. एक विचाराचा गट असा आहे की, हे रोग अॅड्रेनालिन एक्झॉशन मुळे होतात तर इतर काहींच्या मते ही एक autoimmunity आहे.

अती मानसिक तणावामुळे शरीरातील अॅड्रेनालिन ग्रंथीची कार्यक्षमता कमी होते व त्या ग्रंथीची काही रसायने (hormones) निर्माण करतात त्याचे प्रमाण एकदम कमी होते. समजा जंगलात तुम्हाला वाघ दिसला तो बघून तुम्ही एकदम घाबरता व तुमच्या रक्तात अॅड्रेनालिनचे प्रमाण वाढते व तुम्ही एकदम धूम ठोकता. तुमच्या या शारीरिक व्यायामाने काही तासातच तुमच्या शरीरातील रसायने पूर्वीसारखी होतात. आता समजा ऑफिसमध्ये बॉस तुमच्यावर एकदम चिडतो. यानेसुद्धा तुमच्या शरीरातले अॅड्रेनालिन वाढते; पण या बॉसच्या चिडण्यामुळे अॅन्टिडॉट म्हणून तुम्ही पळ काढत नाही किंवा इतर कोणताच शारीरिक व्यायाम घेत नाही आणि मग ते जास्त आलेले अॅड्रेनालिन दुसऱ्या एखाद्या रसायनाची निर्मिती करते किंवा आधीच असलेल्या रासायनिकावर प्रक्रिया करते व आपल्याला अल्सर, कोलाजेन रोग वगैरे विपुल प्रमाणात मिळतात. त्यासाठी तणावनिर्मित रोगावर व्यायाम हा अत्यंत उपयुक्त उपाय आहे. नॉर्मन कझिन्स तर असे म्हणतात की, चिंता, भय वगैरे भावनांमुळेच त्यांचा रोग निर्माण झाला. म्हणून ते घरी गेल्यावर भरपूर हसायला लागले.

त्यांच्या रोगावर ते डॉ. लाइनस पॉलिंगच्या सल्ल्याप्रमाणे भरपूर व्हिटॅमिन C घ्यायला लागले. सुदैवाने त्यांना एक कलुषित न झालेला डॉक्टर भेटला त्याच्या देखरेखीखाली ते व्हिटमिन C चे भले मोठे डोस घ्यायला लागले. त्यांच्या बिकट अवस्थेमध्ये त्याचा सेडिमेंटेशन रेट पुष्कळ वाढत असे. कझिन्सनी व त्यांच्या डॉक्टरांनी काही प्रयोग सुरू केले. आधी हसण्याचा प्रोग्रॅम, मग व्हिटॅमिन C व मग सेडिमेंटेशनची नोंद त्या दोघांना कित्येक वेळा असे आढळून आले की, हसण्यामुळे व व्हिटॅमिन C मुळे सेडिमेंटेशन रेट बराच खाली येत असे. (हा एक प्लेसॅबो इफेक्टसुद्धा होऊ शकतो हे कझिन्स स्वत:च मान्य करतात. प्लेसॅबो असर म्हणजे आपण औषध घेतले आहे, आता आपल्याला निश्चितच बरे वाटेल अशी एक ठाम समजूत. बऱ्याच वेळा डॉक्टर्स काही कॅप्सुलमध्ये साधी पावडर व काहीमध्ये खरे औषध भरून, पेशंटला तसे न सागता, प्लेसॅबो असरच्या चाचण्या घेत असतात.

आता व्हिटॅमिन C चा असर सरळ डॉ. कझिन्सच्या कोलाजेन रोगावर होतो असे नाही. व्हिटॅमिन C ला असर आधी अॅड्रेना-

लिन ग्रंथींवर होऊन अॅड्रेनालिन एक्झॉशन कमी होते असे श्री. कझिन्स म्हणतात. हे व्हिटॅमिन शरीराच्या इतर endocrine ग्रंथीला उत्तेजित करते व त्यामुळे collagen रोगांना आळा बसतो, असाही एक दृष्टिकोन आहे. शरीरयंत्रणा कधीकधी अशा वेडयावाकडया मार्गाने काम करीत असते की, रोगाचा व औषधाचा वरवर काहीही संबंध नसताना काही रोग बरे होत असतात. कधीकधी शरीर इतके हळवे व संवेदनाशील होऊ शकते की, डॉक्टरांच्या औषधाच्या मान्याने ते किंचाळते. श्री. कझिन्सच्यासारख्या रोगावर अमेरिकेत १२ ते २४ अॅस्पिरिनसारख्या गोळया दिवसाकाठी देतात पण कझिन्सना असे आढळून आले की, अॅस्पिरिनमुळे तर त्याचा रोग वाढत आहे. शेवटी दवाखान्यात श्री. कझिन्सना Iatrogsisene झाला आहे याची त्याना खात्री पटली. इॲट्रोजेनेसिस म्हणजे डॉक्टरांच्या ट्रीटमेंटमुळेच पेशंटची झालेली अधिक हानी. (आधीच विचारा आजाराने हैराण झालेला असतो.) सरतेशेवटी स्वत:चे ज्ञान वापरून अंथरुणाला खिळलेले कझिन्स मृत्यूच्या जबडयातून परत आले. कझिन्सनी केलेले प्रयोग त्यांनी केले नसते तर ते दिवंगत झाले असते का? हॉस्पिटलमध्ये राहून आजार वाढतो का? डॉक्टर पेशंटचे म्हणणे कितीसे ऐकून घेतात? पेशंट हा एका भल्या मोठया यंत्रणेमधील एक cog in the wheel च राहिला आहे का? मग विज्ञानाच्या घोडदौडीमुळे जर पेशंटची अवस्था अधिकाधिक बिकट होत जात आहे तर मग नव्या संशोधनांचा कितीसा उपयोग होत असतो? काही प्रमाणात पेशंटचा फायदा जरूर होत असेल. शेवटी आजारी पडणे ही एक touch-and-go affair आहे असेच म्हणावे लागेल

कझिन्सनी आपले अनुभव फारच तरलपणे मांडले आहेत. 'अमेरिकन्स हे एखादी वस्तु हातात आली की, उडया मारायला लागतात,' असे म्हटलेले आपण ऐकतो. त्या मानाने ब्रिटिश डॉक्टर्स काय किंवा सामान्य माणूस काय, फार सोबर असतात, असेही आपण ऐकतो; परंतु कझिन्स यांच्या पुस्तकात उडया मारायचा प्रकार मला तरी आढळला नाही!

— जे. एन्. पोंडा

# दे. भ. रत्नाप्पा कुंभार : प्रेरक व्यक्तिमत्त्वाची ओळख

कुठल्याही पुस्तकाच्या सुरुवातीला असलेल्या प्रस्तावनेवरून पुस्तकाचे स्वरूप आणि लेखकाचा वकूब, यांची तोंडओळख होऊ शकते. त्यावरून वाचकाला 'पुढे सरकावे' किंवा नाही याचा अंदाज येतो.

'समाजप्रबोधनाची ४० वर्षे–देशभक्त श्री. रत्नाप्पा कुंभार याच्या जीवन-चरित्रावर नवा प्रकाशझोत' हे (वृत्तपत्रातील मथळा शोभेल असे) नाव असलेले पुस्तक व त्यावरील श्री. रत्नाप्पा व श्रीमती इंदिराजींचे रंगीत चित्र पाहून कुणालाही प्रथम ते प्रचारकी किंवा मुद्दाम लिहवून घेतलेले पुस्तक वाटेल. मलाही तसे वाटले होते; पण अंतरंगात प्रवेश केल्यावर तो गैरसमज दूर झाला. प्रस्तावनेतच विषयाची निकड व लेखकाचा 'स्पार्क' दिसून आला आणि त्यात भावडेपणा नसल्याची खात्री झाली

श्री. रत्नाप्पा कुंभार याच्या नि:स्वार्थ कार्यामुळे या पुस्तकाचे लेखक बाळ महाजन झपाटून गेले आहेत. त्यातूनच त्यांना असे पुस्तक लिहिलेच पाहिजे, अशी नैतिक जबाबदारी वाटू लागली; परंतु तत्पूर्वी महाजनांनी श्री. अण्णाच्या सामाजिक, राजकीय, सार्वजनिक (आणि खाजगी सुद्धा) जीवनाचा त्रयस्थपणे, सावधानतेने अभ्यास केलेला आहे. गेली ४०–४५ वर्षे कोल्हापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अविश्रांत धडपड करणाऱ्या रत्नाप्पाण्णांचे सर्वस्पर्शी व्यक्तिमत्त्व पाहून बाळ महाजन मोहरून जातात. 'या हिंदुस्थानात इतका सच्चा माणूस असतोच कसा?' हा प्रश्न त्याना पडतो.

म. गांधींच्या प्रेरणेने, त्यांचा आदर्शवाद डोळयांपुढे ठेवून श्री. अण्णा आज सत्तरीतही ठामपणे उभे आहेत. 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' म्हणजेच रत्नाप्पाण्णा असे समीकरण देखील मांडता येईल. नैतिकता, सदभिरुची, समाजसेवेची कळकळ आणि विधायक कर्तृत्व या गुणामुळे अण्णांचे नेतृत्व वेगळेच उठून दिसते.

रत्नाप्पाण्णाचे जीवन हीच समाजप्रबोधनाची ४० वर्षे मानून (आणि तसे आहेच) श्री. बाळ महाजन यांनी केवळ ५७ पानामध्ये त्याची गौरवगाथा गाइली आहे. समाज–प्रबोधनाची पार्श्वभूमी, स्वातंत्र्यलढा, जनसामान्याचा नेता आणि विधायक कामात मोलाचे कार्य–या चार प्रकरणांत देशभक्त रत्नाप्पाच्या चरित्राचा धावता आढावा लेखकाने घेतलेला आहे पत्रकारी शैलीचे ते वैशिष्ट्यच आहे. थोडक्यात पण मुद्देसूदपणे कोणत्याही विषयाचे उत्तम संकलन! शेकडो पाने वाचत बसायला आज कोणाला वेळ आहे? अर्थात, हे जरी खरे असले तरी श्री. महाजनांनी रत्नाप्पाजींचे अजून चांगले, विस्तृत चरित्र लिहावे, असे वाटते. कदाचित त्याचा तसा मानस असेलही.

'जे बोलायचे ते करायचे व जे करता येईल तेवढेच बोलायचे, हे अण्णाचे ब्रीद आहे. देशावरची जाज्वल्य भक्ती हीच त्यांची जीवननिष्ठा आहे. असंख्य क्रांतिकारकांना त्यांच्यापासून प्रेरणा लाभली आहे स्वातंत्र्यलढयाच्या चळवळीत त्यांचा सक्रीय सहभाग आहे. कॉलेज–शिक्षणाला रामराम ठोकून त्यांनी समाजसेवेला वाहून घेतले. सत्याग्रहाच्या प्रचंड शक्तीचे दर्शनातूनच सहकारी चळवळीच्या विलक्षण सामर्थ्याचा साक्षात्कार अण्णाना झाला. पंचगंगा सहकारी साखर कारखान्याच्या परिसरातील १००–१५० खेडयाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. कसलाही गाजावाजा न करता, त्याचे लोकविलक्षण कार्य उभे राहिलेले आहे.

शेतकरी, आदिवासी, पददलित याना शिक्षण व स्वावलंबनाची प्रेरणा रत्नाप्पांनीच दिली आहे. स्वाभिमान आणि निर्भयता हे दोन गुण त्यांनी गांधीजींपासून घेतलेले आहेत. स्वराज्यासाठी विकासकार्य आणि क्रियाशील कार्यातच समृद्धी यावर त्यांचा विश्वास आहे. 'देशभक्त' ही सार्थ पदवी लोकानीच त्याना दिली आहे. विनोबाजी त्याना 'गोरा कुंभार' म्हणतात. खरोखर, सामाजिक समतेचा पुरस्कार करणारे अण्णा गोरा कुंभारच आहेत.

पंचगंगा सहकारी साखर कारखाना व

ोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सूत-गिरणीची आज कोटयवधी रुपयाची उलाढाल चालू आहे. श्री. अण्णांच्या संघटनाचातुर्यामुळे भोवतालच्या परिसरात उपसा जलसिंचन योजना, विहीरदुरुस्तीची कामे, वाचनालये, तालमी, क्रीडांगणे, महिला मंडळे, बालवाडया, समाजमंदिरे जागोजाग उभी राहिली आहेत. हे कार्य अधिक दृढ व्हावे म्हणून लोकाची यांत्रिक, वैज्ञानिक वृत्ती वाढवण्याचे प्रयत्नही, रत्नाप्पाण्णा जाणीवपूर्वक करत आहेत. सुमारे २० हजार कुटुंबांना तिथे आसरा मिळालेला आहे.

साखरकारखाना, सूतगिरणी, कागदगिरणी, सहकारी बँक, शेतकरी संघ, तंबाखू खरेदी-विक्री संघ, सहकारी ग्राहक भांडारे, अॅल्युमिना प्रकल्प हे सगळे अण्णाच्या कर्तृत्वाचे आविष्कार आहेत. कार्य अखंड चालू ठेवण्यातच त्याना आनंद व समाधान आहे. लोकानी श्रम करावेत, शहाणे व्हावे, खूप वाचावे, मोठे व्हावे यासाठी त्याची धडपड आहे. इतके असूनही ते सगळया कार्याकडे अलिप्तपणे पाहू शकतात. तीच खरी त्याची शक्ती आहे.

**—रवींद्र गुर्जर**

समाजप्रबोधनाची ४० वर्षे
लेखक प्रकाशक : बाळ महाजन
कि. ११ रु.

□

---

## महाराष्ट्रात नागालॅंड तयार होत आहे काय ? : पृष्ठ २ वरून

विसरू शकणार नाहीत. परंतु 'नानिवली' च्या गोळीबारानंतर प्रचंड सरकारी दडपण आले. भूमिगत चळवळ, पुढारी अटकेत आणि एकंदरीत चळवळीचे एकाकीपण यामुळे चळवळ शिथिल होत गेली. लाल बावटयाच्या नावाखाली थोडया प्रमाणात गुंडगिरीही सुरू झाली. परको सावकार जाऊन काही प्रमाणात सघन 'दादाचे' वर्चस्व आले. या चळवळीचा रेटा इतका जबरदस्त होता की, शोषणाविरुद्ध उभ्या ठाकलेल्या आदिवासींना अपरिहार्यपणे हिंसेचा, गुंडगिरीचा, दडपशाहीचा आधारही घ्यावा लागला. अर्थात हा C. P. M चा आदेश नव्हता तर चळवळीला लागलेले हे उत्स्फूर्त वळण होते व ते काही प्रमाणात अपरिहार्य होते; पण येथूनच सी. पी. एम. च्या चळवळीला पूर्वीची धार न रहाता काही शिथिलता व मर्यादा आली. स्थानिक पातळीवरचे १-२ कार्यकर्ते बेगुमान दंडेलीगिरीच्या जोरावर भ्रष्टही झाले. एकंदरीतच भारतातील कम्युनिस्ट चळवळीचे प्रतिबिंब बरोबर ठाणे जिल्ह्यातही उमटले. पक्षांतर्गत वादही विकोपाला गेले. पूर्वीइतकी जनतेवरची पकडही राहिली नाही.

सी. पी. एम. स्वत:च्या कमकुवतपणामुळे खचत असतानाच सी. पी. एम. ला खच्ची करण्याचे अनेक प्रयत्न झाले. विशेषत: लाल बावटेवाले लोकांना झोडून मीटिंगला आणतात, बैलांच्या शेपटया कापतात, ठार मारतात इ. प्रचार सर्रास झाला. सी. पी. एम. चे अनेक कार्यकर्ते पूर्वी सर्वोदयी व समाजवादी पक्षात होते. सर्वोदयी व प्र. स. पक्षाने हेतुपुरस्सर सी. पी. एम. ला खच्ची करण्यासाठी ठाणे जिल्ह्यात काम सुरू केले, अशी सी. पी. एम. ची भावना ! लहानू कोम तर कै. आचार्य भिसे याचे जुने साथीदार ! नारगोळकरानी कॅनाड येथे सुरू केलेले काम, प्रजासमाजवाद्यानी केलेला जमिनीचा लढा इत्यादी उदाहरणे फार जुनी नाहीत. आजही सर्वोदयी व काही समाजवाद्याचा आंधळा पण कट्टर कम्युनिस्टविरोध संपलेला नाही. सी. पी. एम. चा दावा असा की, स्थानिक कार्यकर्त्यांना पुढारपण देऊन, लाल बावटयाबद्दल अपप्रचार करून, शेवटी कॉंग्रेसच्या सहकार्याने आमचे खच्चीकरण करण्याचे प्रयत्न झाले आहेत. सी. पी. एम.ला एकाकी पाडून नेस्तनाबूत करणे, हे विरोधकाचे एकमेव धोरण आहे, असा गोदूताईंचा आरोप !

या पार्श्वभूमीवरच कष्टकरी संघटना व लाल बावटा चकमकीचा विचार करता येईल, पण तत्पूर्वी काही महत्त्वाच्या घटना नमूद कराव्या लागतील. समाजवादी पक्षातील एक कार्यकर्ता काळूराम दोधडे याने समाजवादी पक्षाचा राजीनामा देऊन 'भूमिसेना' स्थापन केली. मार्क्सवाद्याचा तिटकारा पण समाजवाद्यांनाही कंटाळलेल्या काळूरामला काही स्थानिक व काही बाहेरील कार्यकर्त्यांनी साथ दिली. जमिनीचे हस्तांतर, वाधील-गडयाची मुक्तता या प्रश्नानंतर; विशेषत: ७३ च्या दुष्काळानंतर किमान-वेतन, एकाधिकार खरेदी (भात व गवत) रोजगार हमी, आदिवासी उपयोजना या समस्यांवर भूमिसेना वाढली. पालघर तालुक्यात भूमिसेना फोफावली. सी. पी. एम. चे तळागाळातले काम बऱ्यापैकी शिथिल असताना, भूमिसेना मात्र वाढत गेली; पण ७७ च्या लोकसभा निवडणुकीनंतर भूमिसेनेचा मार्क्सवाद्याना विरोध कमी होऊ लागला. समान कार्यक्रम व निवडणुकीच्या प्रश्नावर भूमिसेना व सी. पी. एम. एकत्र येऊ लागले. लालबावटयाचा कोम विरुद्ध समाजवाद्याचा काळूराम हे चित्र पालटून ७७ नंतरच्या प्रत्येक निवडणुकीत भूमिसेनेने सी. पी. एम. ला पाठिंबा दिला आणि याच भूमिसेनेच्या मदतीने कष्टकरी संघटनेचे कार्यकर्ते आपले बस्तान बसवू लागले !

४८ ५० पासूनच्या लाल बावटयाच्या चळवळीला प्रखर विरोध केला तो मिशनऱ्यानी. त्यामुळे ख्रिश्चन बहुसंख्य आदिवासी विभागात सी पी. एम. पोचू शकली नाही. सी. पी. एम. खच्ची करण्यासाठी मिशनऱ्यानी सर्व प्रकारे प्रयत्न केले. कॉंग्रेसला उचलून धरले. फादर मिरांडा या गृहस्थाने या कामी खूपच पुढाकार घेतला. त्यामुळे मिशनरी, लाल बावटा हा या भागातील फारच जुना वाद! ही गोष्ट या प्रकरणात फारच महत्त्वाची असल्यामुळे ती नमूद केल्याशिवाय या प्रकरणाला न्यायच देता येणार नाही.

तर अशा मिशनरी परंपरेतून बाहेर पडलेल्या 'पीटर' ऊर्फ प्रदीप प्रभू व निकी कार्डोझो या 'फादर' तरुणानी सुशीला डिसोझाच्या सहकार्याने काही स्थानिक तरुणाना संघटित केले व महाराष्ट्रातील काही स्थानिक संघटना, संस्था व विचारवंताच्या साहाय्याने कष्टकरी संघटना चालू केली. पॉलो फ्रिअरीचे विचार मानणाऱ्या या तरुणांवर मार्क्सवादाचाही प्रभाव होता. ते आम्ही 'धर्म' मानत नाही असेही सांगू लागले.

कष्टकरी संघटनेने काम चालू केले ते सी. पी. एम. च्या बाले-किल्ल्यात, म्हणजे डहाणू–तलासरी तालुक्यात. सी.पी.एम.चे शैथिल्य व काही भ्रष्ट कार्यकर्ते याच्यावर झोड उठवूनच त्यांनी कामाला सुरुवात केली. सी. पी. एम. च्या स्थानिक नेतृत्वावर व पक्षावर जाहीर व सर्रास भ्रष्टाचाराचे आरोप झाल्यामुळे सी. पी. एम. चे लोक भडकले; परंतु खरोखरच काही कार्यकर्ते भ्रष्ट होते. त्याना सी. पी. एम. ने नंतर पक्षातून बाहेर काढलेही. तलासरीजवळील एका गावातील भय्याने लोकांची 'बाकी' दिली नव्हती या प्रश्नावर पहिला लढा कष्टकरी संघटनेने दिला. सी. पी. एम. चे म्हणणे असे की, त्या गावातील लोक पहिल्यापासून मिशनऱ्याच्या प्रभावाखाली होते, लाल बावट्याच्या चळवळीत सामील झाले नाहीत, म्हणून या विशिष्ट गावातील लोक अत्याचाराचे बळी ठरले आणि मुख्य म्हणजे सरघोपट व दडपशाहीने भय्याला गारद करून, त्याच्या बायकोवर जे अत्याचार झाले, त्याला सी. पी. एम. चा विरोध होता आणि कष्टकरी संघटनावाल्यांनी कितीही नाकारले तरी त्या प्रकरणात, विशेषतः भय्याच्या स्त्रीवरील अत्याचाराचा कोणीही निषेध करील.

कष्टकरी संघटनेशी व त्यांच्या कार्यकर्त्यांशी माझा जो काही संबंध आला त्यावरून माझीही अशी समजूत झाली की, ते हाडाचे अँटी–सी. पी. एम. आहेत.

## फुटीरतेचा शिक्का का ?

आज महाराष्ट्रात तरुणांमध्ये, निरनिराळ्या गटांमध्ये, पाक्षिक-दैनिकांमध्ये एक ठशीव अँटी–सी. पी. एम. वृत्ती आढळते व ती कष्टकरी संघटनेमध्ये जास्त सजीव आहे. त्याचा मित्रपरिवार, सहानुभूतीदार यामधले बहुसंख्य अँटी–सी. पी. एम. वाले आहेत. मार्क्सवादी पक्षातले क्रांतिकारकत्व संपले असून फक्त सुधारणावाद व नोकरशाही आणि भ्रष्टाचार वाढला आहे असे मत असणाऱ्या लोकांच्या जोरावर, त्यांच्या पाठिंब्यावर कष्टकरी संघटना सर-सावली. सुरुवातीला एका छोटेखानी गटाचे स्वरूप असल्यामुळे आदिवासींच्या 'वेगळेपणा'वर जोर देणे कष्टकरी संघटनेला आवश्यक वाटले. बाहेरच्यांच्या शिरकावामुळे झालेले आदिवासींचे शोषण आणि त्यामुळे होणारे हाल या वस्तुस्थितीमुळे कदाचित सी. पी. एम. ची भावना अशी होणे शक्य आहे की, कष्टकरी संघटनावाले फुटीरवादी आहेत. सुरुवातीच्या काळात कष्टकरी संघटनावाल्यांना घेतलेल्या भूमिकाही फारच साहसवादी व 'रोमँटिक' होत्या. भय्याच्या वर दिलेल्या प्रकरणावरून तर सुशीला डिसोझा व निकीभाऊ आम्ही 'अंडरग्राउंड' आहोत असे कौतुकाने सांगत उघडउघड पुण्या-मुंबईत चकरा मारीत ! जंगल जमीन प्रश्नाच्या वेळेस खरे तर कष्टकऱ्यांनी 'अतिक्रमण' चालू ठेवा असे सांगितले की काय न जाणे ! पण त्यांच्या विभागातील अतिक्रमण मात्र वाढले ही गोष्ट खरी !

मुख्य म्हणजे कष्टकरी संघटनेबद्दल कमालीची संदिग्धता आहे. त्यांच्या परिवारात नक्षलवाद्यापासून सर्वोदयी विचारापर्यंतचे लोक आहेत. दिल्ली-बँगलोरच्या सेमिनारलाच नव्हे तर चक्क गोहत्तीलाही ते आसाम-आंदोलनाच्या काळात जाऊन आलेले. अनेक गट, संस्था व व्यक्ती–ज्या एकमेकाशी परस्परविरोधी आहेत–त्याचे यांचे येणे-जाणे.

कष्टकऱ्यांची नेमकी विचारप्रणाली कोणती, मित्रसंघटना कोणत्या, आर्थिक बाबींचे काय याबाबत तशी स्पष्टता नाही. केवळ वर्ष-दीड वर्षाचे व ७८ गावातले काम–या जोरावर जी अतिप्रचंड प्रसिद्धी झाली (बातम्या, लेख, फोटो, कार्यकर्त्यांची वैयक्तिक चरित्रे) त्याबाबत अनेक गोष्टी गुलदस्तात आहेत. एकंदरीत देशाची परिस्थिती, आर्थिक धोरणे व शासनसंस्थेचे स्वरूप याबद्दलचे आकलन स्पष्ट न करता केवळ आदिवासींचे शोषण बाहेरच्यांमुळे होते एवढेच फोकस केल्याने त्यांच्यावर फुटीरतेचा शिक्का बसतो यात नवल ते काय ?

मिशनऱ्यांशी संबंधांबाबत जाहीर कितीही केले तरी काही गोष्टी पटत नाहीत. डहाणूला मोर्चा असला की, सरसकट मोर्चाला फादर मिरांडानी जेवण देणे किंवा मुंबईच्या–भायखळ्याच्या सेंट मिराज-मध्ये कार्यकर्त्यांचे मुक्काम, पुण्यातील डी. नोबिलीच्या विद्यार्थ्यांचे, प्राध्यापकांचे कष्टकऱ्यांकडे व कष्टकऱ्यांचे त्यांच्याकडे येणे-जाणे या गोष्टींचा अर्थ काय होतो ? कष्टकऱ्यांच्या गाण्यावरही ख्रिश्चन धर्माची छाप पूर्वी होती. अजूनही फादर मिरांडाशी त्यांचे सख्य आहे. मुंबई-बेंगलोर येथील चर्च व मिशनरी संघटनांशी त्यांचे घनिष्ट संबंध आहेत. जर मिशनऱ्यांवरून त्यांच्यावर आरोप होत असतील तर जाणीवपूर्वक या गोष्टी ते का बदलत नाहीत ?

भूमिसेना व सी. पी. एम. यांचेही एकमेकांशी मतभेद असून या दोघांच्यात अशा चकमकी का झाल्या नाहीत, याचाही विचार या संदर्भात व्हायला पाहिजे. सी. पी. एम. ही एक महत्त्वाची शक्ती आहे व त्यांना नेस्तनाबूत न करता कार्यक्रमाच्या पातळीवर संबंध ठेवून पण वेळप्रसंगी टीका करूनही आपले स्वतंत्र अस्तित्व भूमि-सेना ठेवू शकते. मग कष्टकरी संघटनेबाबत असा तिढा का यावा ?

या सर्व गोष्टी असल्या तरी गोदावरीबाई परुळेकरांनी कष्टकरी संघटनावाले परदेशी हस्तक असल्याचा आरोप करून टोकाची भूमिका घ्यावी काय ? सुशिला डिसोझावर नैतिक स्वरूपाची किंवा चारित्र्यविषयक टीका करण्यापेक्षा राजकीय स्वरूपाची टीका अपे-क्षित आहे सी. पी. एम. कडून होणारी टीका ही धोरणविषयक, राजकीय स्वरूपाची न होता वैयक्तिक स्वरूपात का व्हावी ? मुख्य म्हणजे अशी गंभीर स्वरूपाची टीका करताना सज्जड पुराव्यानिशी जर आरोप केले तर ते जास्त वाजवी ठरेल आणि प्रामुख्याने वर्त-मानपत्री आरोप व दहशतीच्या वातावरणापेक्षा, जनतेवरची ढिली झालेली पकड जास्त पक्की करण्यासाठी, पक्षात व जनतेत पडलेले अंतर कमी करण्यासाठी, काही तरी भरीव स्वरूपाचे काम किसान-

सभा अगर सी. पी. एम. ने हातात घेणे जास्त महत्त्वाचे ठरेल. तसेच आदिवासींचे केवळ तात्कालिक व सुट्या स्वरूपाचे प्रश्न घेऊन, त्याला वेगळे वळण न देता, एकंदरीत समाजव्यवस्थेच्या प्रश्नातील एक भाग म्हणून त्याचा विचार करणे–ही पद्धतीच जास्त महत्त्वाची ठरेल, हे कष्टकऱ्यांनी ही ओळखायला हवे. माझ्या माहितीत व अनुभवात तरी कष्टकरी संघटना ' नागालँड करू ' असे म्हणाली नाही; पण निव्वळ आदिवासींचे प्रश्न घेऊन इतरांना बाहेर हाकलून काढावे असा रोख मात्र त्यांच्या भाषणात व घोषणात दिसून येतो. सी. पी. एम. नेही या भावनेला कौल लावून परकीय हस्तक असल्याची ' बिना–पुरावा ' आवई उठवू नये.

आज नाही म्हटले तरी सी. पी. एम. कडे सत्तराहून जास्त पंचायती आहेत, एक आमदार आहे, लढ्याची परंपरा आहे, राष्ट्रीय पातळीवर पर्यायाची ताकद आहे व तरुण स्थानिक कार्यकर्ते नव्या जोमाने त्यांच्याकडे येत आहेत. आज अशा वेळी अनाठायी अँटी सी. पी. एम. भूमिका घेऊन एक प्रबळ चळवळ नाहीशी करणे कितपत योग्य ठरेल याचा विचार ' कष्टकरी ' व इतर संघटनांनीही करावा. सी. पी. एम. मध्ये दोष असतील, ढिलाई असेल व या चुका त्यांनाही थोड्या–फार प्रमाणात मान्य आहेत असे दिसते. असे असताना त्यांच्या बालेकिल्ल्याला भगदाड पाडणे ही पुरोगामी व परिवर्तनशील विचारसरणी मानावी काय ?

सी. पी. एम. काय किंवा कष्टकरी संघटना काय यानी हा प्रतिष्ठेचा प्रश्न न करता काही तरी मार्ग काढला नाही तर दोघांच्या भांडणातला लाभ उठवायला कॉंग्रेसचा कावळा टपूनच बसला आहे. थोडे सबुरीने घेऊन सी. पी. एम. ने ' नेटवर्क ' ला लागावे व एका ठोक अँटी–सी. पी. एम. विचारसरणीस थारा देऊन मार्क्सवाद्यांना प्रमुख शत्रू न मानता आपली धोरणे व कार्यक्रम यात स्पष्टता आणण्याचा कष्टऱ्यांनी प्रयत्न करावा. विशेषतः इतर संघटनांनी हा पुढाकार आपणाहून घेतला पाहिजे. केवळ स्थानिक भागापुरता मर्यादित दृष्टिकोन न ठेवता, झाले गेले उकरून न काढता, हे प्रयत्न व्हावेत व ते सुद्धा राष्ट्रीय पातळीवरील राजकारणाचा एक भाग म्हणून !

जोपर्यन्त कष्टकरी संघटनेची भूमिका व कार्यक्रम संदिग्ध व वरील आरोपांना पुष्टी देणारी राहील तोपर्यन्त त्यांच्याबाबत विश्वासार्हतेचे वातावरण होणार नाही. गोदूताईंशी झालेल्या कष्टकऱ्यांच्या पहिल्या भेटीत कार्यकर्त्यांनी नाव–गाव सांगण्यासही नकार द्यावा, येथूनच संशय सुरू झाला असून तो असाच वाढत जाण्यास फार वेळ लागणार नाही.

एकमेकांवर केवळ भावनिक आरोप करून चिखलफेक करण्याएवजी ठाणे जिल्ह्यातील परिस्थिती, तिचा इतिहास, आखावी लागणारी धोरणे, लढ्याचे स्वरूप–या प्रकारे टीका व मतभेद का व्यक्त होत नाहीत ?

एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे लॅटिन अमेरिकेतील चळवळीमुळे ख्रिश्चन युवक मोठ्या प्रमाणात डाव्या चळवळीकडे वळत आहेत. या ना त्या स्वरूपात चर्च, मिशन, ट्रस्ट आदी संस्थांशी ते संबंधित आहेत. केवळ ते आपल्या पक्षाबरोबर काम करत नाहीत म्हणून 'परदेशी हस्तक ' या नावाने त्यांची बोळवणही होऊ नये. ' चकमक व नागालँड ' हे आरोप तसे वरवरचे आहेत. अर्थपूर्ण टीका अगर समजुतीने मार्ग न निघाल्यास तो न लाल बावटेवाल्यांचा बालेकिल्ला राहील न नागालँड; पण कॉंग्रेसवाल्यांचे राखीव कुरण मात्र हमखास ठरेल !

□

---


## गांधी खून घटनेवर वेगळा प्रकाश




**लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# तुमची मुले

## संध्याकाळी खेळतात का ?

पुण्यातील लोकवस्ती दिवसेदिवस वाढतच आहे. शहरातील दूरदूरच्या ठिकाणी नव-नवीन वस्त्या निर्माण होत आहेत व नव्या वस्त्यामध्ये रहाणाऱ्यांपुढे नवे प्रश्न उभे रहात आहेत. अशा अनेक प्रश्नामध्ये मुला-मुलीना संध्याकाळी व्यवस्थितपणे खेळण्याची सोय नसणे हाही एक प्रश्न आहे. वेगवेगळे सांघिक खेळ खेळण्याची सधी मिळाल्याने मुलांचे मनोरंजन व व्यायाम तर होतोच शिवाय त्याच्यामध्ये खिलाडूवृत्ती व शिस्त बाणण्यासाठी तर त्याचा अतिशयच उपयोग होतो.

नवीन वस्त्यामध्ये मुलांना खेळण्यासाठी मोकळ्या जागा राखून ठेवलेल्या असतात; परंतु मुलांना खेळ शिकविणाऱ्या युवकांच्या अभावामुळे या जागाचा योग्य वापर करता येत नाही. अनेक युवकांना अशा ठिकाणी आपल्या लहान भावाना खेळ शिकवण्याची व त्यांना काही चांगले वळण लावण्याची इच्छा असते. परंतु त्यासाठीच्या जरूर त्या शिक्षणाच्या अभावी त्यांना ते काम हाती घेता येत नाही. शहरातील असे खेळ खेळण्या-शिकवण्याची प्रस्थापित केंद्रे आता नवीन वस्त्यांना दूर पडतात. शिवाय रहदारीच्या अडचणी बिकट होत आहेत. पालकांना आपल्या मुलांना तेथे पोचविणे व परत आणणे अतिशय अवघड होते. अशा अडचणी-मुळे मुले व जागा उपलब्ध असूनसुद्धा त्यांना खेळण्याची साधी सोय घरापासून अगदी नजीक उपलब्ध होऊ शकत नाही.

आठनऊ ते चौदापंधरा या वयोगटातील मुलाना खेळता खेळता चागले वळण लावणे ही एक मोठी समाजसेवा आहे व ती बऱ्याच युवकांना, तसेच अशी इच्छा असणाऱ्यांना सहज जमू शकेल. अशांना काही प्राथमिक शिक्षण देण्याची तयारी आमच्या पुणे शहर भारत स्काउट व गाईड संस्थेने केली आहे. दि २ आक्टो. पासून चार महिन्याचा हा एक प्रशिक्षणवर्ग संस्थेच्या पंतसचिव मैदानावर सायंकाळी ६ ते ८॥ या वेळात होईल. या वर्गासाठी आपण आपल्या गृहनिर्माण संस्थेतर्फे अगर युवक संस्थेतर्फे कोणीही शिकाऊ व्यक्ती जरूर पाठवाव्यात. या वर्गातून त्यांना मैदानी खेळ, बालमानसशास्त्र, सहली, कथाकथन, अभिनय, प्रथमोपचार, लेझिम, आसने, समूहगीते अशा प्रकारचे कार्यक्रम कसे घ्यावेत याचे प्रत्यक्ष शिक्षण देण्यात येईल. त्याचा उपयोग करून त्या शिक्षित व्यक्तीने आपआपल्या वस्तीमध्ये मुलांसाठी एकदीड तासाचे क्रीडाकेंद्र चालवावे अशी अपेक्षा आहे. भाग घेणाऱ्या व्यक्तीची इच्छा असेल तर त्याच अवधीमध्ये स्काउट अधिकाऱ्यांचा प्राथमिक शिक्षण-वर्गही त्यांना पुरा करता येईल व पुढे आपल्या वस्तीमध्ये अधिकृतपणे स्काउट पथकही सुरू करता येईल असे कार्यक्रम शिकणाऱ्या व्यक्ती या कोणी संस्थेतर्फेच भाग घेण्यासाठी आल्या पाहिजेत अशी खास आवश्यकता नाही; परंतु अशी स्त्रीपुरुष व्यक्ती हौशी पाहिजे व त्या शिक्षणाचा उपयोग करून पुढे वेगवेगळ्या वस्त्यांमध्ये मध्यम वयीन मुलांना खेळाच्या द्वारे काही योग्य वळण लावण्याची तिला आवड पाहिजे.यासाठी त्या व्यक्तीची वयोमर्यादा १८ ते ३० या गटात बसणारी असेल तर उत्तमच, परंतु जास्त स्वारस्य असणाऱ्यांसाठी ही मर्यादा शिथिल करता येईल. या वर्गासाठी प्रवेश फी रु. १० शिवाय इतर काहीही खर्च येणार नाही. सहली वगैरेसाठी काही नैमित्तिक खर्च येईल तो वेगळा. हे कार्यक्रम त्या त्या विषयातल्या अधिकारी व्यक्ती शिकवतील.

तरी आपण या वर्गाचा फायदा जरूर घ्यावा व योग्य व्यक्तीच्या नावाची नोंद २२ सप्टेंबर १९८० पर्यंत पुणे शहर भारत स्का. व गा. संस्थेच्या कचेरीत सध्याकाळी ७ ते ७॥ या वेळात जरूर करावी अशी विनंती आहे. एकूण फक्त ५० च व्यक्तीचा या वर्गात समावेश करता येणार असल्याने आपली नोंदणी जितक्या लवकर होईल तितके अधिक इष्ट.

तसेच स्त्री अथवा पुरुष अशा कोणाही व्यक्तीस या वर्गासाठी येता येईल.

आपले

प वि. सोहोनी — वर्गप्रमुख
मु. शं किर्लोस्कर — अध्यक्ष

**भारत स्काउट व गाईड संस्था**

पंतसचीव क्रीडांगण, भिकारदास मारुती-जवळ, सदाशिव पेठ, पुणे ३०.


**नवीन दाखल झालेली पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| १. | विचारधारा–(निवडक लेख) प्रभाकर पाध्ये संपादन व प्रस्तावना : प्रा. म. द. हातकणंगलेकर | १०.०० |
| २. | तोंड आणि तांबूळ (व्यक्तिचित्र) ग. दि. माडगुळकर | ३०.०० |
| ३. | घरंदाज गोष्टी (कथासंग्रह) अनुवाद : अशोक शहाणे | २० ०० |
| ४. | पॅरिसमध्ये जनू रमेश मंत्री | २०.०० |
| ५. | राजा मॅकियावेली–अनुवाद–अरुन्धती खंडकर | ३.५० |
| ६. | साहित्यसिंह ( कृ. के. कोल्हटकरांचे चरित्र ) गं. दे. खानोलकर | ४०.०० |
| ७. | भास्करबुवा बखले ( चरित्र ) नी. म. केळकर | |
| ८. | स्मृतिचित्रे ( Unabridged ) लक्ष्मीबाई टिळक | ४५.०० |
| ९. | मी दासी हिटलरची ( पॉलिन कोहलर ) अनुवाद : शंकर अभ्यंकर | १५.०० |
| 1. | **Alistair MacLean's Hostage Tower** ( Thriller ) John Denis | £ 1.00 |
| 2. | **Born With The Century** ( Novel of Power and intrigue ) William Kinsolving | £ 1.50 |
| 3. | **The Greek** ( Tycoon's Novel ) Pierre Rey | —75 P. |

☐ *A ' Phoenix ' member is better informed !!*

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

# चित्रपट

सदानंद बोरसे

# अपने पराये

## अर्थात स्त्रियांची तोबा गर्दी – आसवांचा पूर ! !

तुम्ही नीलायम थिएटरच्या आसपास जर सध्या घुटमळलात तर त्या ठिकाणी थिएटरमधून उगम पावलेले अनेक खाऱ्या पाण्याचे झरे तुम्हाला आढळतील. बासू चटर्जी दिग्दर्शित 'अपने पराये' नावाचा अस्सल कौटुंबिक चित्रपट तेथे स्त्रियांच्या प्रचंड तोबा गर्दीत चालू आहे. चित्रपट पाहण्यास येताना घरून सगळ्यांनी मोठमोठे टॉवेल आणलेले असतात आणि सबंध वेळ टॉवेलने डोळे पुसणे, तो पुरेसा सर्द आणि ओला झाला की पिळणे आणि पुन्हा डोळे टिपायला सुरुवात करणे एवढाच उद्योग चालू असतो.

शरच्चंद्र चटर्जींच्या 'निष्कृति' या कथेवरून हा चित्रपट घेतला आहे. सख्खे असूनही परके वागणारे आणि चुलत असूनही सख्ख्याहून जवळचे असणारे तीन भाऊ (दोन सख्खे एक चुलत), त्यांच्या बायका आणि मुले अशा एका परिवाराची ही कथा. सुरुवातीला थोरला भाऊ (उत्पल दत्त) आणि चंदर–चुलत भाऊ (अमोल पालेकर) सिद्धेश्वरी (आशालता) आणि शीला (शबाना आझमी) या त्यांच्या बायका आणि त्यांची मुले यांचा 'नांदा सौख्यभरे' असा संसार सुरळीत चालू असतो. सगळे घर शीलाच्या प्रेमळ शिस्तीखाली वागत असते. घरातील सामान भरण्यापासून थोरल्या जावेचे औषधपाणी करण्यापर्यंत बारीकसारीक गोष्टींवर लक्ष ठेवून शीला घराची गाडी उत्तम हाकत असते. चंदर मात्र पैसे मिळवण्याऐवजी पैसे घालवण्याचाच उद्योग करीत असतो. अशातच सिद्धेश्वरीचा धाकटा दीर (गिरीश कर्नाड), धाकटी जाऊ नयनतारा (भारती आचरेकर) आपल्या पुत्ररत्नाबरोबर त्यांच्याकडेच राहण्यास येतात. नयनताराचा एकुलता एक लाडोबा मुलगा अतुल आणि शीला यांच्यातील खटक्यातून नयनतारा आणि शीलाच्या शीतयुद्धाची ठिणगी पडते आणि शेवटी त्याचे पर्यवसान चंदर आणि शीला आपल्या मुलांसह घराबाहेर पडण्यात होते. या क्षणापासून चंदर, शीला अँड सन्सवर हरिश्चंद्र-तारामतीपासून रामचंद्र-जानकीपर्यंत जी जी संकटे येणे शक्य आहे, ती सर्व येतात आणि मग या संकटांच्या अग्नीतून तावूनसुलाखून अधिक झळाळी घेऊन बाहेर पडलेल्या सोन्याप्रमाणे चंदर, शीला अँड सन्स पुन्हा एकत्र परिवारात सामील होतात. या वेळी अर्थातच नयनताराच्या गोटाने पराभूत होऊन आपले डेरे हलविलेले असतात.

बासू चटर्जी बहुधा स्वतःचे चित्रपट पाहत नसावेत. अन्यथा किती गोष्टी आपण स्वतःच्या चित्रपटात त्याच त्याच आणि पुनःपुन्हा वापरत असतो, हे त्यांच्या लक्षात यायला हरकत नव्हती.

चित्रपटात सर्वांत सुंदर काम झाले आहे शबाना आझमीचे. ज्या भूमिकेत तडकभडकपणा नाही वा चॉकलेटी सौंदर्य ही ज्या भूमिकेची गरज नाही, अशा भूमिकांमध्ये शबाना नेहमी चपखल बसते. 'यह कैसा इन्साफ', 'थोडीसी बेवफाई' नंतरचे शबानाच्या अशा भूमिकेचे हे तिसरे उदाहरण. विशेषतः अशी भूमिका एखाद्या मनस्विनीची असेल तर ती शबानाच्या एकूण व्यक्तिमत्वाला सहजच भावते. 'अपने पराये' मधील शीला त्यामुळेच शबानाने जीव ओतून साकारली आहे. घराला शिस्त लावण्यापासून प्रसंगी घराच्या बाहेर पडण्यापर्यंत सर्व गोष्टी 'मोडेन पण वाकणार नाही !' या जिद्दीने करणाऱ्या शीलासाठी शबानाहून अधिक योग्य कोण मिळणार ?

'अपने पराये' मधून आशालता आणि भारती आचरेकर या दोन मराठी रंगभूमीवरील अभिनेत्र्या प्रथमच हिंदी पडद्यावर आल्या. आशालताबाईंचे किंचित मराठमोळे हिंदी सोडले तर दोघींचे हे पहिले पाऊल पुढे पुढेच पडत राहील, अशी आशा करू या ! चित्रपटातील अमोल पालेकर, गिरीश कर्नाड इत्यादींची कामेही चांगली झाली आहेत; पण सर्वाधिक लक्षात राहतात थोरल्या भावाच्या भूमिकेतील उत्पल दत्त ! आपल्या वकिलीत आत्यंतिक रमलेला, घरगुती गोष्टींमध्ये अजिबात लक्ष न घालणारा हा आत्यंतिक प्रेमळ थोरला भाऊ उत्पलदांनी फारच सुरेख उभा केला आहे. चित्रपटात जेमतेम दहा–बारा मिनिटांचे काम आणि वीस–बावीस वाक्यांचे बोलणे असूनही सर्वाधिक लक्षात राहते ती उत्पलदांचीच व्यक्तिरेखा !

चित्रपटाचे संगीतकार भप्पी लाहिरी. चित्रपटातील बहुतेक गीतांच्या चाली गोड दिल्या असल्या तरी येसूदासच्या भजनांना एक अतिशय चमत्कारिक ताल वापरून भप्पी लाहिरींनी प्रेक्षकाच्या कानाला बराच त्रास दिला आहे. चित्रपटाची रंगसंगती हाही डोळ्यांना त्रासदायक ठरलेला प्रकार. ऑर्वो कलर, गेवा कलर आणि फूजी कलर

('अपने पराये' ऑर्वो कलरमध्ये आहे.) हे तीन प्रकार जर नाहीसे केले तर डोळ्यांवरील एक मोठा अत्याचार नाहीसा होईल!

'थोडक्यात' 'अपने पराये'ला जाताना जर टॉवेल घेऊन जायचे नसेल तर या खाऱ्या पाण्याच्या तडाख्यातून बचावण्यासाठी रेनकोट आणि गमबूट घेऊन तरी जावेच लागेल!

*

## अॅग्रीमेंट

एक अतिशय पुढारलेली नवमतवादी, स्त्रीमुक्तीची पुरस्कर्ती वगैरे तरुणी आणि तिला निरनिराळ्या युक्त्या लढवून, एक सुगृहिणी, विनयी, 'जिचे हाती पाळण्याची दोरी' वगैरे आदर्श भारतीय नारी बनविणारा तरुण, ही गोष्ट काही हिंदी चित्रपटाला नवीन राहिली नाही तरी पुन्हा एकदा न कंटाळता सर्व मसाला वापरून दिग्दर्शक अनिल गांगुलीनी तीच गोष्ट पकवली आहे. मध्यवर्ती कथाकल्पना तीच असूनही एखाद्या बऱ्या दिग्दर्शकाच्या हाती ती थोडीफार सुसह्य होऊ शकली असती; पण त्या कल्पनेमध्ये थोडीशी खलनायकी, ओघाने येणारी फुटकळ कट–कारस्थाने आणि पुष्कळशी मारामारी या गदळ गोष्टी घुसडल्याने अनिल गांगुलीनी तिच्या जुनाटपणाचा आणखी चोथा केला आहे.

माला (रेखा) नावाची विदेशात शिक्षण घेऊन आलेली मुलगी स्वत:साठी एका निरुपद्रवी व पत्नीव्रती नवऱ्याच्या शोधात असते. शेखर (शैलेंद्र सिंग) नामक तरुण तिला मिळतोही. त्याच्याबरोबर ती लग्न करते म्हणजे एक करार करते. 'नवऱ्याने घरातील सर्व कामे, तर बायकोने घराबाहेरील सर्व कामे करायची, बायकोच्या पाहुण्यांची सर्व सरबराई नवऱ्याने करायची, बाहेर लोकांसमोर बायकोबरोबर एक फूट अंतर ठेवून तर एकांतात कमीत कमी सहा फूट अंतर ठेवून वागायचे' इत्यादी इत्यादी आणि इत्यादी कलमे असलेल्या त्या 'अॅग्रीमेंट' वर शेखर सही करतो आणि मग पुढे अनेक प्रसंगांमधून या करारी व्यवहाराचे खऱ्याखुऱ्या प्रेमात रूपांतर होते.

चित्रपटातील तीन–साडेतीन प्रसंगांमध्ये हसण्यासाठी विस्कटलेला चेहरा सोडल्यास बाकी वेळ चेहऱ्यावर कंटाळा, वैताग, राग, त्रासिकपणा, जांभया अशा प्रतिक्रिया वेळोवेळी उमटत राहतात. सुंदर दिसण्यामुळे आणि बऱ्या अभिनयामुळे रेखा पडद्यावर दिसणे हा चित्रपटातील त्यातल्या त्यात बरा भाग. बावळट, जोरू का गुलाम शेखर उभा करण्यासाठी शैलेंद्र सिंगला खास प्रयत्नांची आवश्यकताच लागत नाही. बाकी उत्पल दत्त, असरानी, सुजीतकुमारपासून बिंदू, अरुणा इराणीपर्यंत सगळ्यांनी लहानमोठ्या आकाराच्या पाट्याच पाट्या टाकून पाट्यांचा एक मोठा ढीगच रचला आहे.

'अॅग्रीमेंट' संगीतकार बप्पी लाहिरीचे आहे. गीतकार गुलशन बावरा. ¤

## चित्रपटाबाहेर

निर्माता फिरोजखान हा आपल्या चित्रपटाची प्रदर्शनपूर्व हवा तयार करण्यात अतिशय वाकबगार मानला जातो. 'अपराध' मध्ये मोटर–रेसचे आकर्षण, 'धर्मात्मा'च्या आधी घोडदौड आणि बलात्कार तर 'कुर्बानी' पूर्वी नादिया हसनचे 'आप जैसा कोई मेरी जिंदगी में आये' ची हवा. शिवाय कुर्बानीबद्दलच्या असंख्य कथा–दंतकथाही प्रसारित झाल्या आहेतच. 'कुर्बानी'च्या प्रीमिअरला असलेले पाचशे, एक हजार रुपयांचे दर आणि बाराशे रुपयांना विकले गेलेले झीनत अमानच्या शेजारचे तिकिट या कथा जुन्या होतात न होतात, तोच कुर्बानीबद्दलची आणखी एक दंतकथा वाचण्यात आली.

कुठल्याशा एका गावात दिवसाला आठ या दराने एक आठवडाभर 'कुर्बानी' दाखविण्यात आला. रात्री दोन वाजता पहिला खेळ सुरू होई आणि मग चोवीस तास रिळे फिरतच असत. एक आठवड्यानंतर दिवसाला आठच्या ऐवजी दिवसाला सात खेळ दाखविण्यात येऊ लागले.

हे वाचल्यावर भारतात चित्रपट व्यवसायाची अगदी 'दिन दूनी, रात चौगुनी' अशी भरभराट होत आहे, असाच कुणाचाही समज होईल; पण नुकतीच गेल्या सहामाहीतील चित्रपटनिर्मितीची आकडेवारी जाहीर झाली. १९७९ साली संपूर्ण वर्षभरात भारतातील विविध भाषांमध्ये मिळून ७१४ चित्रपट निर्माण झाले; तर १ जानेवारी ते ३० जून या १९८० सालच्या पहिल्या सहामाहीत हीच संख्या ३३१ आहे. म्हणजे याच वेगाने उरलेल्या काळातील चित्रपटही धरून संख्या ६०० ते ६५० असेल. या ३३१ चित्रपटांपैकी १८६ चित्रपट तामीळ, तेलगू आणि मल्याळम् या तीन भाषांमध्ये निघाले आहेत. चित्रपटनिर्मितीबरोबरच 'A' प्रमाणपत्र मिळविणाऱ्या चित्रपटांची संख्याही याच चित्रपटांमध्ये अधिक आहे. ◻

व्हान गॉग
'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद
अनुवादिका
माधुरी पुरंदरे
प्रकाशक
प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे